


महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

गुरुवार, दि. २० नोव्हेंबर २०२५




मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४ थे | अंक : ०७० | किंमत : ४.०० रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com

# 'स्थानिक' निवडणुकांवर आता मंगळवारी सुनावणी

## निवडणूक प्रक्रिया जैसे थे सुरू राहणार; SC चे आरक्षणाची कमाल मर्यादा पाळण्याचे निर्देश

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

सर्वोच्च न्यायालयाने स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमधील ओबीसी आरक्षणाच्या मर्यादेसंबंधीची सुनावणी मंगळवारपर्यंत लांबणीवर टाकली आहे. त्यामुळे सध्याची नगरपंचायत व नगरपरिषदेची निवडणूक प्रक्रिया आहे तशीच सुरू राहणार आहे.

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये ओबीसी आरक्षणाच्या मर्यादेविषयी निर्माण झालेल्या गोंधळामुळे परिस्थिती अधिकच गंभीर बनली आहे. ओबीसींसाठी 27 टक्के आरक्षण लागू करण्याच्या सरकारच्या निर्णयामुळे अनेक शहरांत आरक्षणाची 50 टक्क्यांची कमाल मर्यादा ओलांडली गेल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी गत सोमवारी झालेल्या सुनावणीत सुप्रीम कोर्टाने राज्य सरकारला कोणत्याही स्थितीत आरक्षणाची कमाल मर्यादा पाळण्याचे निर्देश दिले होते. तसेच सध्याची



निवडणूक प्रक्रिया रोखण्याचाही इशारा दिला होता. यामुळे नगरपंचायत व नगरपरिषदेच्या येत्या 2 डिसेंबर रोजी होणाऱ्या निवडणुकीवर अनिश्चिततेचे सावट पसरले होते. पण आज कोर्टाने यासंबंधीची सुनावणी मंगळवारपर्यंत लांबणीवर टाकल्याने ही निवडणूक प्रक्रिया तूर्त जैसे थे सुरू राहणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

आजच्या सुनावणीत कोर्टाने राज्य निवडणूक आयोगाच्या वकिलांना जिल्हा परिषद व महापालिकेच्या निवडणुकीसंदर्भात नोटिफिकेशन काढण्यासाठी काही काळ थांबण्याची विनंती केली. त्यामुळे या प्रकरणी पुढील सुनावणीपर्यंत म्हणजे येत्या मंगळवारपर्यंत हे नोटिफिकेशन निघणार नाही हे स्पष्ट झाले आहे.

या प्रकरणी वकिलांनी दिलेल्या माहितीनुसार, काही लोकल बॉडीजचे नोटिफिकेशन अद्याप जाहीर झाले नाही. त्यामुळे कोर्टाने राज्य निवडणूक आयोगाच्या वकिलांना नोटिफिकेशन काढण्यासाठी थांबण्याची विनंती केली. त्यानुसार, निवडणुकीची सध्याची प्रक्रिया आहे तशीच सुरू राहील, पण त्याचे निकाल जाहीर होणार नाहीत. या निवडणुकांना कोणतीही स्थगिती नाही. पण ज्या नवीन निवडणुका जाहीर व्हायच्या आहेत, त्यावर मात्र निवडणुकीचे नोटिफिकेशन मंगळवारपर्यंत जाहीर होणार नाही. आजच्या सुनावणीत जिल्हा परिषदेच्या निवडणुकांचा उल्लेख झाला नाही. पण महापालिका निवडणुकीचे नोटिफिकेशन आले नसल्याचे सांगण्यात आले. याचा अर्थ असा होतो की, यापुढे जिल्हा परिषदेचे नोटिफिकेशनही मंगळवारपर्यंत जाहीर होणार नाही, असे ते म्हणाले.

### न्यायालयाच्या पुढील आदेशाची प्रतीक्षा

सध्या न्यायालयीन सुनावणीचे पुढील टप्पे निर्णायक ठरणार आहेत. न्यायालयाने आरक्षण मर्यादा पाळण्याचे आदेश पुन्हा कडकपणे स्पष्ट केले आहेत. त्यामुळे सरकार आता कोणता निर्णय घेते, बांठिया आयोगाचा अहवाल कसा मांडते आणि न्यायालयाची प्रतिक्रिया काय असते, यावरच स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका वेळेवर होतील की थांबवण्यात येतील, हे अवलंबून आहे. सर्वसामान्य नागरिक, उमेदवार आणि राजकीय पक्ष आता सर्वोच्च न्यायालयाच्या पुढील आदेशाची प्रतीक्षा करत आहेत.

या प्रकरणी यापूर्वी झालेल्या सुनावणीत याचिकाकर्त्यांने मराठवाड्यातील अनेक पालिकांमध्ये 27 टक्के ओबीसी आरक्षण लागू केल्यानंतर आरक्षणाचा टक्का वाढल्याची बाब न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली होती. विकास गवळी यांनी दाखल केलेल्या या याचिकेवर न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमला बागची यांच्या खंडपीठाने सोमवारच्या सुनावणीत संताप व्यक्त केला होता. त्यात कोर्ट म्हणाले होते की, त्यांच्या पूर्वीच्या आदेशातच म्हटले होते की, बांठिया आयोगाच्या आधी जी परिस्थिती होती, त्यानुसारच निवडणूक घ्याव्यात. म्हणजेच, ओबीसी आरक्षण नसतानाचा आराखडा वापरला पाहिजे. परंतु सरकारने या आदेशाचा सोयीचा अर्थ काढून आरक्षण वाढवले, अशी कठोर टिप्पणी न्यायालयाने केली.

या सुनावणीत अनेक मुद्द्यांवर तीव्र चर्चा झाली. राज्याचे महाधिवक्ता तुषार मेहता यांनी न्यायालयाला सांगितले की, निवडणूक प्रक्रिया सुरू झाली आहे आणि काही मुदती वाढवता येणार नाहीत. मात्र, न्यायालयाने त्यांच्या या कारणांवर समाधान व्यक्त केले नाही. न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी स्पष्ट शब्दांत म्हटले, आमचा आदेश अगदी सरळ होता, पण तुमच्या अधिकाऱ्यांनी गोंधळ केला आहे. 50 टक्क्यांच्या वर आरक्षण गेलं तर निवडणूक प्रक्रियाच आम्ही रोखू शकतो. न्यायमूर्ती जॉयमला बागची यांनीही घटनेतील आरक्षण मर्यादेचा उल्लेख करून सरकारला खबरदारीचा इशारा दिला. राज्य सरकारने अधिक वेळ मागितल्यानंतर न्यायालयाने आज पुढील सुनावणी ठेवली असून त्यानंतर निवडणुकीचे भविष्य ठरणार आहे.

दरम्यान, राज्यातील 246 नगरपरिषद आणि 42 नगरपंचायतींसाठी निवडणुकीची प्रक्रिया सुरू झाली आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत काल संपली असून आजपासून अर्जांची छाननी सुरू झाली आहे. वैध उमेदवारांची यादी जाहीर झाल्यानंतर 19 ते 21 नोव्हेंबरदरम्यान अर्ज मागे घेण्याची संधी उमेदवारांना मिळणार आहे. 26 नोव्हेंबर रोजी चिन्हांसहित उमेदवारांची अंतिम यादी जाहीर होईल. 2 डिसेंबरला मतदान घेण्यात येणार असून 3 डिसेंबरला निकाल जाहीर होतील. मात्र सर्वोच्च न्यायालयाच्या इशाऱ्यामुळे हा संपूर्ण कार्यक्रम प्रश्नचिन्हाखाली आला आहे.




## चीनकडून 'राफेल'च्या बदनामीचा कट

**नवी दिल्ली: (समर्थ गांवकरी)**

मे महिन्यात भारत आणि पाकिस्तानमध्ये निर्माण झालेल्या तणावपूर्ण लष्करी परिस्थितीदरम्यान चीनने फ्रेंच बनावटीच्या राफेल लढाऊ विमानाविरोधात खोटी माहिती पसरविण्यासाठी मोहीम राबवून जागतिक स्तरावर दिशाभूल करण्याचा मोठा कट रचला होता, असा गंभीर आरोप अमेरिकन-चिनी आर्थिक आणि सुरक्षितता पुनरावलोकन आयोगाने आपल्या वार्षिक अहवालात केला आहे.

## एकनाथ शिंदेंनी शहांकडे केली रवींद्र चव्हाण यांची तक्रार



**नवी दिल्ली : (समर्थ गांवकरी)**

- पक्ष प्रवेशांसाठी मोठ्या प्रमाणात पैशाचा व्यवहार केला जात असल्याचा आरोप

राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बुधवारी दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली. या भेटीमध्ये राज्यात महायुतीतील राजकीय घडामोडींची माहिती त्यांनी शहा यांना दिली. महायुतीतील काही नेते महायुतीमधील वातावरण दूषित करण्याचा प्रयत्न करत आहेत, केवळ वैयक्तिक स्वार्थापोटी काम करत आहेत, त्याचा फटका महायुतीला बसू शकतो, असे म्हणत भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांची तक्रार केल्याचे समजते. राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा बिगुल वाजला आहे. पहिल्या टप्प्यात नगरपरिषदा आणि नगरपंचायतींच्या निवडणुकांना सुरुवात झाली आहे. यातच महायुतीमध्ये मित्रपक्ष असलेल्या भाजप आणि शिवसेना शिंदे गटामध्ये काही प्रवेश आणि घडामोडींवरून वाद सुरू झाले आहेत. माध्यमांमध्येही दोन्ही बाजूंनी आम्ही जास्त सक्षम अशी वक्तव्ये येत आहेत. या पार्श्वभूमीवर एकनाथ शिंदे बुधवारी रात्री दिल्लीत दाखल झाले. त्यानंतर त्यांनी अमित शहा यांची भेट घेतली. सूत्रांच्या माहितीनुसार, या भेटीमध्ये एकनाथ शिंदे यांनी भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांची तक्रार अमित शहा यांच्याकडे केली. रवींद्र चव्हाण यांच्यामुळे महायुतीत मिठाचा खडा पडत आहे आणि महायुतीच्या विरोधातील बंडखोर नेत्यांना काही लोकांकडून रसद पुरवली जात आहे. निव्वळ पक्ष प्रवेशांसाठी मोठ्या प्रमाणात पैशाचा व्यवहार होत आहे. भाजपचे माजी प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या समन्वयाचा दाखला देत एकप्रकारे नवीन प्रदेशाध्यक्षांच्या भूमिकेवरच एकनाथ शिंदे यांनी या भेटीत प्रश्नचिन्ह उभे केल्याचे समजते.

## भारत पुन्हा आमच्यावर हल्लाबोल करू शकतो : ख्वाजा आसिफ

**इस्लामाबाद : (समर्थ गांवकरी)**

भारताकडून आमच्यावर पुन्हा हल्ला होऊ शकतो, अशी भीती पाकिस्तानचे संरक्षणमंत्री ख्वाजा आसिफ यांनी व्यक्त केली असून, 'ऑपरेशन सिंदूर' मुळे बसलेल्या तडाख्याने पाक अजूनही सैरभैर झाल्याचे स्पष्ट झाले आहे. भारताचे लष्करप्रमुख उपेंद्र द्विवेदी यांनी दिलेल्या धारदार इशाऱ्याच्या पार्श्वभूमीवर, आसिफ यांनी हे वक्तव्य केले आहे. दिलेल्या मुलाखतीत आसिफ म्हणाले, आम्ही कोणत्याही परिस्थितीत भारताकडे दुर्लक्ष करत नाही किंवा त्यांच्यावर विश्वास ठेवत नाही. माझ्या विश्लेषणाच्या आधारे, मी भारताकडून असलेल्या युद्धाची किंवा



इतर कोणत्याही रणनीतीची शक्यता नाकारू शकत नाही. त्यामुळे आपण पूर्णपणे सतर्क राहिले पाहिजे. या महिन्याच्या सुरुवातीलाच आसिफ यांनी पाकिस्तान एकाच वेळी येणाऱ्या धोक्यांना तोंड देण्यासाठी तयार असल्याचे म्हणत अधिक आक्रमक पवित्रा घेण्याचे संकेत दिले होते. एका माध्यमाशी बोलताना ते म्हणाले होते, आम्ही पूर्व (भारत) आणि पश्चिम (अफगाणिस्तान) दोन्ही सीमांवर तोंड देण्यासाठी तयार आहोत. अल्लाहने पहिल्या फेरीत आम्हाला मदत केली आणि दुसऱ्या फेरीतही तो आम्हाला मदत करेल. जर त्यांना अंतिम फेरी हवी असेल, तर आमच्याकडे युद्धाशिवाय पर्याय नाही.




# नितीश कुमार यांचा आज शपथविधी

## मंत्रिमंडळात भाजपकडून नवे चेहरे शक्य

**पाटणा : (समर्थ गांवकरी)**

बिहारचे मुख्यमंत्री म्हणून संयुक्त जनता दलाचे सर्वेसर्वा नितीश कुमार गुरुवारी विक्रमी दहाव्या वेळी शपथ घेतील. येथील गांधी मैदानावर त्यांचा शपथविधी होईल. राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या (रालोआ) बिहार विधिमंडळ पक्षनेतेपदी नितीश कुमार यांच्या निवडीची औपचारिकता पूर्ण करण्यात आली. शपथविधी सोहळ्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह तसेच विविध राज्यांचे मुख्यमंत्री उपस्थित राहणार आहेत. रालोआ नेत्यांच्या बैठकीत नितीश कुमार यांच्या निवडीचा प्रस्ताव संयुक्त जनता दलाचे नेते विजय चौधरी यांनी दिला. त्याला भाजप विधिमंडळ पक्षाचे नेते सम्राट चौधरी व उपनेते विजय सिन्हा तसेच लोकजनशक्ती पक्ष (रामविलास), हिंदुस्थानी अवाम मोर्चा व राष्ट्रीय लोक मोर्चाच्या आमदारांनी अनुमोदन दिले. या बैठकीपूर्वी नितीश कुमार यांची संयुक्त



जनता दल विधिमंडळ पक्षनेतेपदी निवड करण्यात आली. या बैठकीला जनता दलाचे नवनिर्वाचित आमदार तसेच विधान परिषदेतील २२ सदस्य उपस्थित होते. याबाबतचा प्रस्ताव विजय चौधरी यांनी मांडला व उमेश कुशवा यांनी त्याला अनुमोदन दिले.

भाजप विधिमंडळ पक्षनेतेपदी तारापूरचे आमदार सम्राट चौधरी यांची निवड करण्यात आली. याबाबतची घोषणा पक्षाचे केंद्रीय निरीक्षक व उत्तर प्रदेशचे उपमुख्यमंत्री केशव प्रसाद मौर्य यांनी केली. तसेच विजय सिन्हा यांची उपनेतेपदी निवड करण्यात आली. मंत्रिमंडळात भाजप काही नव्या चेहऱ्यांना संधी देण्याची शक्यता आहे. बुधवारी सकाळी नितीश कुमार यांनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा राज्यपालांकडे सोपवत नव्या सरकार स्थापनेचा मार्ग सुकर केला. मंत्रिमंडळात स्थान मिळवण्यासाठी ज्येष्ठ आमदारांच्या बुधवारी गाठीभेठी सुरू होत्या. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार भाजप आणि संयुक्त जनता दलातून मंत्रिमंडळात पाच ते सहा नवे चेहरे असतील. संयुक्त जनता दलाचे प्रदेशाध्यक्ष उमेश सिंह कुशवा हे मन्नेर मतदारसंघातून विजयी झाले आहेत. त्यांना स्थान दिले जाईल अशी शक्यता आहे. लोकजनशक्ती पक्षाला तीन तर हिंदुस्थानी अवाम मोर्चा आणि राष्ट्रीय लोक मोर्चाला प्रत्येकी एक मंत्रीपद मिळण्याची शक्यता आहे.

# काँग्रेसची मनधरणी



## संपादकीय

निवडणुका जाहीर होईपर्यंत नकली डरकाळ्या फोडणाऱ्या उबाठाला प्रत्यक्ष मैदान दिसू लागताच कसा घाम फुटला आहे, हे गेल्या दोन-चार दिवसांतल्या त्यांच्या प्रयत्नांतून, त्यांच्या मुखपत्रांच्या माध्यमांतून दिसू लागलं आहे. मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत आपलं पुरतं वस्त्रहरण होणार हे ओळखून त्यांनी पूर्वीच मोठ्या प्रयासाने मनसेला मनवलं आणि आपल्याबरोबर घेतलं. मनसेसोबत येताच यांनी यांच्याच बाजूने दर दोन दिवसांनी एकीची ग्वाही द्यायला सुरुवात केली. 'आम्ही एकत्र आलो आहोत, ते एकत्र राहण्यासाठीच', हे पालुपद दोन-चार कार्यक्रमांत लावून त्यांनी उरल्यासुरल्या शिवसैनिकांना रोखण्याचे प्रयत्न केले. बेजान नेतृत्वामुळे हिंमत हरलेल्या शिवसैनिकांना शिवसेनेच्या उंबऱ्याआड रोखण्याचा तो प्रयत्नही फारसा यशस्वी झाला नाही. त्यामुळे, दिवाळीचं निमित्त साधून कौटुंबिक स्नेहसंमेलनाचे देखावे करण्यात आले. कोणतीही दुरावलेली कुटुंबं एक होत असतील, तर ती चांगलीच गोष्ट आहे. पण, तुमची कुटुंबं म्हणजेच तुमचे पक्ष नव्हेत. सैनिकांच्या कुटुंबांचा विचार कोणी करायचा? संपूर्ण पक्ष म्हणजेच कुटुंब असण्याचे वंदनीय शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वाचे दिवस कधीच सरले. आता शिवसैनिकाला पोरकं करून, त्याला झिडकारून 'माझे कुटुंब हीच माझी जबाबदारी' चे दिवस सुरू झाल्याने उबाठाच्या ताकदीला इतकी उतरती कळा लागली आहे, की प्रत्येक निवडणुकीत त्यांचं अधिकाधिक वस्त्रहरण होत चाललं आहे. येत्या मुंबई, ठाणे, कल्याण, भिवंडी, विरार, नवी मुंबई या महामुंबईतल्या महानगरपालिकांच्या निवडणुकांसाठी निवडणूक लढवतील असे उमेदवारही त्यांना मिळायला तयार नाहीत, अशी परिस्थिती झाल्यानंतर आता 'महाविकास आघाडी' चं कातडं पांघरून त्याआड लाज झाकण्याचे प्रयत्न सुरू झाले आहेत. काँग्रेसने स्वतंत्र निवडणूक न लढवता 'आघाडी' त राहावं आणि 'आघाडी' म्हणूनच निवडणूक लढवावी, यासाठी विविध मार्गांनी वेगवेगळे युक्तिवाद केले जात आहेत. उबाठाची ही केविलवाणी स्थिती व्हायला जबाबदार तेच आहेत. ते आणि त्यांच्या प्रवक्त्यांची मुद्दाम वक्तव्यं. मनसेला सोबत आणण्याचं मिशन मोठ्या प्रयासाने यशस्वी केल्यानंतर जणू 'घोडं गंगेत न्हालं' या आनंदात त्यांनी आघाडीतल्या इतर पक्षांच्या दिशेने लाथा झाडायला सुरुवात केली. उबाठाच्या प्रवक्त्यांनी तर जुलै महिन्यात सातत्याने 'महाराष्ट्रात आता आघाडीची गरज राहिलेली नाही', 'मनसे आणि उबाठा सोबत असतीलच. इतरांनी आपापल्या भूमिकांचा विचार करावा' यासारखी वक्तव्यं केली होती. काँग्रेसच्या स्थानिक नेत्यांनी तीच वक्तव्यं लक्षात घेऊन आता महापालिका निवडणुकीसाठी 'एकला चलो रे' ची भूमिका घेतली आहे. जुलैपासूनच्या बातम्यांची कात्रणं दाखवून त्यांनी त्यांच्या दिल्लीतल्या नेत्यांनाही त्यासाठी राजी केलं आहे. काँग्रेसने स्वतंत्रपणे निवडणुका लढवण्याची भाषा सुरू केली, तेव्हा आघाडीतल्या कोणत्याच पक्षाने ती गांभीर्याने घेतली नाही. मनसेची हिंदी भाषिकांविरोधातली, अल्पसंख्याक समुदायांविरोधातली भूमिका जगजाहीर असल्याने महाराष्ट्रात मनसेला आघाडीत घेतलं, त्यांच्याबरोबर बसलो, तर बिहारच्या निवडणुकीत त्याचा फटका बसेल, या विचाराने काँग्रेसचे नेते ही विधानं करत असतील. बिहारची निवडणूक झाली की, त्यांची भाषा आपोआप बदलत जाईल, असा उबाठा आणि मनसेचा विश्वास होता. पण, तो सपशेल फसलेला दिसतो. बिहारमध्ये भुईसपाट होऊनही काँग्रेसच्या इथल्या नेत्यांचा आत्मविश्वास जराही कमी झालेला दिसत नाही! स्वतंत्र लढण्याच्या विचारांवर ते ठाम दिसताहेत. बिहारमधल्या दारुण पराभवानंतर महाविकास आघाडीतले अन्य घटक पक्ष काँग्रेसची किंमत कमी करणार, जागा वाटपात त्यांना दुय्यम स्थान देणार.

## दै. समर्थ गांवकरी सूडोकू क्र. ४१

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | | | | | 3 | | | 5 |
| 9 | 1 | | | | 7 | 4 | | |
| | 3 | 4 | 8 | | | | 2 | 9 |
| 1 | 6 | 9 | | | 8 | 5 | | |
| 3 | | | | | | | | 6 |
| | | 7 | 6 | | | 3 | 1 | 2 |
| 5 | 9 | | | | 2 | 6 | 4 | |
| | | 6 | 5 | | | | 8 | 7 |
| 7 | | | 9 | | | | | 3 |

उत्तर उद्याच्या अंकात

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

### सूडोकू क्र. ४० चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 9 | 1 | 2 | 6 | 4 | 3 | 7 | 8 | 5 |
| 5 | 8 | 7 | 1 | 2 | 9 | 6 | 4 | 3 |
| 3 | 4 | 6 | 7 | 5 | 8 | 2 | 1 | 9 |
| 2 | 7 | 3 | 8 | 9 | 1 | 5 | 6 | 4 |
| 1 | 9 | 4 | 2 | 6 | 5 | 8 | 3 | 7 |
| 8 | 6 | 5 | 4 | 3 | 7 | 9 | 2 | 1 |
| 6 | 2 | 9 | 3 | 7 | 4 | 1 | 5 | 8 |
| 7 | 3 | 1 | 5 | 8 | 2 | 4 | 9 | 6 |
| 4 | 5 | 8 | 9 | 1 | 6 | 3 | 7 | 2 |

### पंचांग

| | | |
|---|---|---|
| पंचांग | संवत्सर - विश्वावसूनाम | १२:१७:०२ |
| २० नोव्हेंबर २०२५ | अयन- दक्षिणायण | नक्षत्र:विशाखा |
| गुरूवार | मास- कार्तिक | १०:५८:३३ |
| विक्रम संवत्- २०८२ | ऋतु - सौर हेमंत | योग:शोभन ०९:५२:२२ |
| कार्तिक शके | कृष्ण पक्ष | करण:नाग १२:१७:०२ |
| संवत्- १९४७ | तिथि:अमावस्या | करण:किस्तुघ्न |

## उपदेशाचे डोस

### कवीचा मोठेपणा

ही घटना आहे लखनौमधील ! त्यावेळी महाकवी निराला अमीनाबाद पार्कच्या पुढील मोहल्यात राहात होते. एक दिवशी ते असेच चालले होते. समोर एक टांगेवाला प्रवाशांची वाट पाहत उभा होता. निरालाजींनी त्याला नीट न्याहाळले व विचारले, परवा तूच मला हजरतगंजहून घेऊन आला होतास ना ? तो म्हणाला, होय हुजूर ! माझ्याकडून काही चूक झाली होती का ? निरालाजी सहज म्हणाले, अजिबात नाही. परवा माझ्याजवळ फक्त दोन आणेच होते. तूला आणखी पैसे द्यायला गेले दोन दिवस मी तुला शोधत आहे. हे पैसे ठेव तुझ्याजवळ ! पांच रुपयांची नोट पाहून तो टांगेवाला चांगलाच उखडला.

निरालाजी म्हणाले, अरे रागावू नको. मी चांगल्या भावनने हे पैसे तुला देत आहे. परवा तुझा मुलगा फाटक्या तुटक्या वस्त्रात धावत तुझ्याकडे येऊन एक पैसा मागत होता, पण तोही तू देऊ शकत नव्हतास. ती तुझी असहाय्यता मी विसरु शकलो नाही. म्हणून हे पैसे ठेवून घे व त्या निरागस मुलाचे मन मोडू नकोस. त्या टांगेवाल्याच्या डोळ्यात आनंदाश्रू उभे राहिले. त्याने निरालाजींची क्षमा मागितली.

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १९१७ - उक्रेन स्वतंत्र घोषित झाला.
- १९४७ - राजकुमारी एलिझेबथ हिने लियुटेनंट फिलीप माउंटबेटन याच्याशी वेस्टमीनीस्टर अबेय, लंडन येथे विवाह केले.

### राष्ट्रीय

- २००६ - उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री मुलायमसिंग यादव यांनी राज्यातील सर्वात मानाचा समजला जाणाऱ्या 'यशभारती' पुरस्काराने चित्रपट अभिनेता अभिषेक बच्चन तसेच क्रिकेटपटू मोहम्मद कैफ यांना गौरविले.


### जन्म

- १६०२ - ऑटो फॉन गेरिक, हवेच्या दाबाविषयी महत्त्वाचे संशोधन करणारे जर्मन शास्त्रज्ञ.
- १७५० - टिपू सुलतान, 'म्हैसूरचा वाघ' म्हणून ओळखला जाणारा पराक्रमी.
- १९१७ - राम गोपाल, प्रख्यात भारतीय नर्तक.
- १९२७ - न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी.
- १९३९ - वसंत पोतदार, मराठी साहित्यिक.

### निधन

- १७६० - फत्तेसिंग भोसले.
- १९१० - लिओ टॉलस्टॉय, प्रसिद्ध रशियन लेखक.
- १९७० - देशपांडे यशवंत खुशाल, ख्यातनाम मराठी संशोधक.
- १९७३ - केशव सीताराम ठाकरे ऊर्फ प्रबोधनकार ठाकरे, प्रसिद्ध पत्रकार.
- १९८९ - हिराबाई बडोदेकर, किराणा घराण्याच्या प्रसिद्ध गायिका.
- २००७ - प्रमोद नवलकर, माजी मंत्री, ज्येष्ठ स्तंभलेखक-पत्रकार आणि शिवसेना नेते.

## दै. समर्थ गांवकरी जम्बो शब्दकोडे क्र. ४१



### आडवे शब्द

१. पहारेकरी
६. टप्प्या-टप्प्याचा प्रवास
१२. माळ, हार
१३. नडलेला, गरजू
१४. डाळीचे कालवण
१५. सांभाळ, संगोपन
१७. गवताचे रुंद पान
१८. वेल
२०. शंभर
२२. प्रचंड
२४. आई
२५. गगन
२७. हद्दपार, वगळलेला
२८. कोय
२९. रोटीचे एक धान्य
३०. एक त्रिदल
३१. आवेशाने पुढे जाणे
३३. पोट
३४. सैन्याचा मालपुरवठा
३६. चिखलाची भुसभुशीत जमीन
३७. श्रीकृष्णाचे एक नाव
३८. रममाण, निमग्न
४०. कबूतर
४१. पुष्कळ
४३. हिंदुस्थानी
४५. भित्रा
४८. एक महाकाय प्राणी
४९. कुंभाराची भट्टी
५१. आत्मियता, करूणामय प्रेम
५२. पुरुष
५३. आकडेमोडीचे शास्त्र
५५. उद्योगी माणसाचा 'शत्रू'
५६. ठाकरे पुत्र
५८. भडीमार
५९. भीती
६१. रक्ताचा नात्यातील
६२. रतिचा पती
६५. आमनेसामने
६८. समुद्र
७०. ग्रामीण बोलीत तेव्हा
७१. जिम्मेदारी
७२. वेळ घालवणे
७४. अभिनेता
७५. त्वरित
७६. चप्पल
७७. गाय
७८. परंतु

### उभे शब्द

१. जीभ. जिव्हा
२. गाढव
३. निकट
४. दरवाजा
५. रात्र
६. हेतू-कारण
७. अंगावरील बारीक केस
८. फिर्याद, अर्ज
९. वाळवंट
१०. धरण, सरोवर, विहीर इ.
११. संगीतातील एक राग
१६. नकला करणारा
१७. सरसरीत
१९. धातूचा धागा
२१. मध
२२. सततचे नामस्मरण
२३. प्रत्येक वर्षी
२४. बिनविजेचा 'फ्रीज'
२५. आपला परका अशी भावना
२६. कपाळ
२८. स्वाभिमानी
२९. इंग्रजी आई
३१. कमीजबरोबरचे एक वस्त्र
३२. दात
३३. अगरबत्ती
३५. वेळ, फुरसत
३६. डोंगराचा तुटलेला कडा
३९. जरच्या बरोबरचा शब्द
४२. दाक्षिणात्य आमटी
४४. धनुष्यबाण
४६. भरीव नसलेले
४७. शिखराचे टोक
४९. व, आणखी
५०. कडक व चिवट
५२. एक क्षार
५४. फणसातील खाद्यभाग
५६. नाहक
५७. न्यूनता, कसर
६०. रसाळ
६१. मंत्रीमंडळ
६३. औषध
६४. हाकाटी, आरडाओरड
६६. मराठीत बाथरूम
६७. टोळी, सैन्याची तुकडी यांचा प्रमुख
६८. हिंमत, धैर्य
६९. तीव्र ऊन
७३. विहीर
७४. शर्त

उत्तर उद्याच्या अंकात

### शब्दकोडे क्र. ४० चे उत्तर

आडवे उत्तर : १.नराधम ४.सरकार ७.कासार १०.दारा ११.मस्त १२.करवत १४.यच्चयावत १५.फारकत १६.पत १७.नवनीत २०.लाचार २२.बाला २३.मालक २५.घड २६.संपादकीय २८.नटराज ३०.बक ३२.तर ३३.नवस ३४.लयबद्ध ३५.भगवान ३७.वाचा ३९.कल ४२.रजई ४३.राजाराणी ४४.न्यायालय ४५.हत्या ४६.गंधक ४८.काजवा ४९.टपोरा ५१.जागर ५२.लता ५४.पर्वत ५६.चपापणे ५८.उदार ५९.अवसर ६०.बेसुमार ८२.जननमरण ६४.सखा ६७.नस ६८.रसदार ६९.वंदनीय ७२.रटाळ ७४.रटरट ७६.तडकाफडकी ७७.रोज ७८.कसर

उभे उत्तर : १.नमनाला घडाभर तेल २.रास्त ३.मकर ४.सवत ५.रत ६.रयत ७.कायापलट ८.साव ९.रतन १०.दामिनी १३.रकमपात १५.फार १६.पलायन १८.वर्ण १९.तडक २१.चाड २२.बाकी २३.मानसकन्या २४.कराल २७.दरवाजा २९.जयजयकार ३०.बद्ध ३१.सवाई गंधर्व ३६.गज ३८.चाराचुरा ४०.लयास जाणे ४१.आत्या ४३.राकट ४५.हवालदार ४७.आसपास ५०.पोळ ५३.तार ५४.पपनस ५५.तलम ५६.चवदार ५७.परसदार ५८.उमा ६१.सुरवंट ६२.जनमत ६३.रडारड ६५.खारट ६६.पाय ७०.नीरस ७१.मोका ७३.टाकी ७५.रस्ता

# नगराध्यक्ष पदासह बारा उमेदवाराची काँग्रेसची वज्रमुठ

## सचिन चौगुले यांची माहिती

**शिर्डी : (समर्थ गांवकरी)**

शिर्डी नगरपरिषदेची निवडणूक ही नऊ वर्षाने होत असल्याने हा निवडणुकीचा उत्सव असुन या उत्सवात जय पराजयाची परवा न करता राष्ट्रीय काँग्रेस पक्षाने नगराध्यक्ष पदासह बारा ठिकाणी काँग्रेस पक्षाने उमेदवार उभे केले असून या उमेदवारांना विरोधका कडुन आमिष व प्रलोभन देण्याचा प्रयत्न केला जात असला तरी काँग्रेसच्या या सर्व उमेदवारांची वज्रमूठ अखंड राहणार असून जन हितासाठी विविध विकासाचे मुद्दे घेऊन शिर्डी नगर परिषदेच्या निवडणुकीला सामोरे जाणार असल्याचे काँग्रेस पक्षातर्फे घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत शिर्डी शहराचे अध्यक्ष सचिन चौगुले यांनी आपली भूमिका स्पष्ट केली यावेळी नगराध्यक्षसह नगरसेवक पदाचे उमेदवार देखील उपस्थित होते सचिन चौगुले म्हणाले की काँग्रेस पक्षाने पॅनल तयार करताना सर्व समावेशक समाज हितासाठी काम करणारे उमेदवार दिले आहे



जनहितासाठी विकासाचा दृष्टिकोन ठेवून हे उमेदवार खंबीरपणे उभे राहिलेले आहे शिर्डीत ही निवडणूक विकासाच्या मुद्द्यावर लढवणार आहे शिर्डीत बेरोजगारी गुन्हेगारी आर्थिक व्यवसाय अनधिकृत अतिक्रमण शिर्डी शहराचे अडचणीत आलेल्या अर्थकारण असे विविध मुद्दे घेऊन आपण जनतेसमोर जाणार आहे शिस्तबद्ध पद्धतीने प्रचार देखील सुरू करण्यात आला आहे जे पराजयाचा विचार आम्ही केलेला नाही जनतेला हवे असलेले उमेदवार आम्ही दिलेले आहे लोकशाहीचा हा उत्सव आहे जय प्रजायची चिंता नाही डिपॉझिट झाले तरी आम्ही हरणार नाही पण काँग्रेस पक्षाचा जनहितासाठी असलेला विचार शेवटच्या घटकापर्यंत घेऊन जाणार आहे असे स्पष्ट केले यावेळी एडवोकेट अविनाश शेजवळ यांनी निवडणुकी बाबत असलेली भूमिका उमेदवारांची माहिती व कोणत्या मुद्द्यावर सामोरे जाणार याबाबत माहिती दिली काँग्रेस पक्षाने नगराध्यक्ष पदासाठी सासर माहेरचा राजकीय वारसा असलेल्या उच्चशिक्षित माधुरी शेजवळ यांना उमेदवारी दिली आहे.



खोडद : हिवरे बुद्रुक येथील प्रगतशिल ऊस उत्पादक शेतकरी श्री.दत्तात्रय बळीराम भोर यांची ऊसतोड चालू असताना विघ्नहर सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष सत्यशील शेरकर यांनी त्यांच्या शेतशिवारात फेरफटका मारून ऊस शेतीची प्रत्यक्षात पाहणी केली व ऊस लागवड, मशागत, जैविक खत, पाटपाणी व्यवस्थापन, ड्रोनद्वारे औषध फवारणी ते ऊस तोडणी पर्यंतची सर्व माहिती जाणून घेतली.

## थोडक्यात बातम्या...

### १० टन डांबरी रस्त्यांची क्षमता वाढवा अमोल बोरगे यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी



**श्रीगोंदा तालुका (स. गांवकरी) :** ग्रामीण भागातील वाहतुकीत गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणात वाढ झाली असून आज वापरली जाणारी वाहने पूर्वीपेक्षा आकारमानाने मोठी आणि जास्त वजन वाहून नेणारी आहेत. त्यामुळे सध्याचे १० टनी डांबरी रस्ते वाढत्या वहनक्षमतेला तोंड देऊ शकत नसल्याने हे रस्ते अल्पावधीतच खराब होत आहेत. या पार्श्वभूमीवर ग्रामीण भागातील रस्त्यांची क्षमता वाढवून १० टनीपेक्षा जास्त क्षमतेचे टिकाऊ व उच्च दर्जाचे रस्ते बांधावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. श्रीगोंदा तालुक्यात चार ते पाच साखर कारखाने असून ऊसवाहतूक दिवसेंदिवस वाढत चालली आहे. तसेच तालुक्यातील भौगोलिक स्थितीमुळे वाळू, माती, वीटभट्टी साहित्य व बांधकाम साहित्याची वाहतूक मोठ्या प्रमाणात होते. या सततच्या जडवाहतुकीमुळे सध्याचे १० टनी रस्ते त्वरित खचतात, तडे जातात व खड्डे पडतात. यामुळे रस्त्यांची वारंवार दुरुस्ती करावी लागत असून खर्च केलेल्या शासकीय निधीचा अपव्यय होत आहे. या सर्व परिस्थितीचा विचार करून ग्रामीण भागातील रस्त्यांचे एस्टिमेट तयार करताना जास्त वाहतूक सहन करणारी आधुनिक रस्ता रचना समाविष्ट करावी, तसेच भविष्यातील वाहतुकीचा अंदाज ध्यानात घेऊन उच्च क्षमतेचे व टिकाऊ सिमेंट रस्ते बांधावेत, असे निवेदन मुख्यमंत्रींकडे सादर करण्यात आले आहे. ग्रामीण विकास, सुरक्षित वाहतूक, अपघातांची संख्या कमी करणे आणि रस्त्यांचा दीर्घकाळ टिकाव यासाठी ही मागणी अत्यंत आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

### आदिवासी दुर्गम भागातील चिल्हेवाडीत साहित्याचे वाटप



**शिवनेरी (स. गांवकरी) :** जिल्हा परिषद पुणे व पंचायत समिती जुन्नर यांच्या विशेष प्रयत्नातून मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत रोटरी क्लब पुणे यांच्या माध्यमातून आदिवासी दुर्गम भागातील चिल्हेवाडी गावात घरकुलाच्या लाभार्थ्यांना साहित्याचे वाटप करण्यात आले. सहा लाभार्थ्यांना प्रत्येकी एक लाख रुपये किमतीचे साहित्य देण्यात आले. या साहित्यामध्ये पत्रे, बॉक्स पाईप व सी अँगल यांचा समावेश होता. या कार्यक्रमाप्रसंगी पंचायत समिती सहाय्यक गटविकास अधिकारी विठ्ठल भोईर सामाजिक, शैक्षणिक, राजकीय क्षेत्रातील अधिकारी- पदाधिकारी उपस्थित होते. उपसरपंच नितीन भोईर यांनी ग्रामस्थांना मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाची माहिती दिली. सरपंच अनुसया भोईर यांनी ग्रामविकास अधिकारी मीरा ठाकर , गावाला वेगवेगळ्या माध्यमातून सहकार्य करणाऱ्या सर्व क्षेत्रातील अधिकारी, कर्मचारी सामाजिक संघटना, संस्था यांचे आभार मानले. सूत्रसंचालन गणेश भोईर व विशेष सहकार्य संजय ठोंगिरे, विनोद भोईर, राजेंद्र महादू भोईर, राजेंद्र भोईर पोलीस पाटील दामोदर बुळे व इतर ग्रामस्थांनी केले.

# कोलडेंभे : वीज वितरण डीपीचे लोकार्पण जनसेवक अनंत घाणे यांच्या हस्ते!

**अकोले : (समर्थ गांवकरी)**

अकोले तालुक्यातील आदिवासी बहुल कोलडेंभे गावातील वीज वितरण डीपीचे फीत कापून लोकार्पण जनसेवक अनंत महादू घाणे यांच्या हस्ते करण्यात आले. लोकार्पणप्रसंगी गावातील लोकप्रतिनिधी, पदाधिकारी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाला मा. सरपंच एकनाथ सारुकते, तुकाराम सारुकते, हनुमंता बुळे, बाळू बुळे, यशवंत घोगरे, कृ.उ.बा. सं. तुकाराम खाडे, रामदास पिचड, योगेश खाडे, बाळू खाडे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

जनसेवक अनंत घाणे यांच्या कार्याचा गौरव : कार्यक्रमात बोलताना मा. सरपंच एकनाथ सारुकते यांनी अनंत घाणे यांच्या कार्याची प्रशंसा करताना सांगितले,





"आदिवासी भागातील रस्ते, वीज, स्मशानभूमी, वाडी-वस्तीवरील पोल अशा अनेक मूलभूत सोयींची कामे अनंत घाणे यांनी सातत्याने केली. वंचितांना न्याय मिळवून देताना व विविध प्रश्न मार्गी लावताना त्यांनी केलेले प्रयत्न कौतुकास्पद आहेत. आज त्यांचा सत्कार करताना अभिमान वाटतो."

कृ.उ.बा.सं. तुकाराम खाडे म्हणाले, "अवकाळी पावसाने झालेले नुकसान असो, पिकविमा, घरकुल, आदिवासी योजनांचे प्रश्न किंवा तहसील कार्यालय व बांधकाम विभागातील प्रलंबित कामे—सर्वच पातळ्यांवर अनंत घाणे यांनी सातत्याने पाठपुरावा करून ग्रामस्थांना न्याय मिळवून दिला." "जनतेचे प्रेम माझे मनोबल वाढवणारे" — अनंत महादू घाणे!

लोकार्पणानंतर ग्रामस्थांनी दिलेल्या प्रेमाबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना जनसेवक अनंत महादू घाणे म्हणाले,

"मा. मंत्री कै. मधुकरराव पिचड साहेब व आमदार वैभवभाऊ पिचड यांच्या मार्गदर्शनाखाली आदिवासी भागातील रस्ते, वीज, भातखरेदी, हिरडा खरेदी, पिकविमा, घरकुल, रेशन, कर्जमाफी, शबरी योजनेसह विविध योजना तळागाळातील वंचितांपर्यंत पोहोचवण्यासाठी मी सदैव प्रयत्नशील राहीन." ते पुढे म्हणाले, "प्रशासनाच्या सहकार्याने अनेक प्रश्न मार्गी लागले असून शेतकऱ्यांच्या खात्यात मदतीचे पैसे नियमित जमा होत आहेत. कोलडेंभे शेतकऱ्यांच्या खात्यात दहा हजारांहून अधिक रक्कम वर्ग झाली आहे. ग्रामस्थांनी दाखवलेले प्रेम आणि विश्वास भविष्यात काम करण्याचे मनोबल वाढवणारे आहे."

"काम करणाऱ्यांच्या पाठीशी जनता उभी" — मा. सरपंच तुकाराम सारुकते कार्यक्रमाच्या शेवटी बोलताना मा. सरपंच तुकाराम सारुकते म्हणाले, "जनसेवक अनंत घाणे सातत्याने लाईट, रस्ते व विविध योजना गावागावात पोहोचवण्याचे कार्य करत आहेत. समाजहिताचे काम करणाऱ्यांच्या पाठीशी जनता कायम उभी राहील." कोलडेंभे गावाच्या सर्वांगीण विकासासाठी झालेले वीज डीपीचे लोकार्पण हा ग्रामविकासाच्या दिशेने महत्त्वाचा टप्पा ठरत आहे.

*श्रीगोंदा तालुक्यात आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष २०२५ निमित्त सहकारी*

# पतसंस्थासाठी एक दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम उत्साहात संपन्न

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**

आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष 2025 व आंतराष्ट्रीय सहकार सप्ताह निमित्त महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ मर्यादित, पुणे, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, अहिल्यानगर आणि सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, श्रीगोंदा यांचे संयुक्त विद्यमाने श्रीगोंदा तालुक्यातील नागरी /ग्रामीण बिगरशेती / सेवक सहकारी पतसंस्थासाठी एक दिवसीय प्रशिक्षण वर्गाचे आयोजन महेश्वर मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि. काष्टी ता. श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर सोसायटीचे सभागृहात करण्यात आलेले होते. सदर प्रशिक्षण कार्यक्रमाचे उदघाटन तालुक्याचे आमदार मा.श्री.विक्रमदादा पाचपुते यांचे हस्ते झाले. प्रशिक्षण कार्यक्रमाचे अध्यक्ष जिल्हा उपनिबंधक सह संस्था अहिल्यानगर मा.श्री.मंगेशजी



सुरवसे साहेब यांनी भूषविले. मा. श्री. धनंजय डोईफोडे सह निबंधक (से. नि) तथा राज्य समन्वयक MCDC पुणे यांनी प्रस्तावना केली. प्रमुख वक्ते श्री. किरण पाटोळे यांनी सायबर सिक्युरिटी, अँटी मनी लॉंड्रीग याबाबत पतसंस्थानी काय काळजी घ्यावी तसेच डॉ. प्रशांत खोपटीकर यांनी थकीत कर्ज वसुली प्रक्रियेसाठी घ्यावयाची दक्षता याबाबत विस्तृत मार्गदर्शन केले. तज्ञ व्याख्याते श्री. मंगेश देहडेकर यांनी ठेव संकलन, निधी व्यवस्थापन तसेच ग्राहक संबंध याबाबत मार्गदर्शन केले. मा. श्री. तानाजी कवडे सहनिबंधक लेखापरीक्षण (से. नि.) पुणे यांनी पतसंस्थांनाचे सुधारित मापदंड याबाबत माहिती दिली. प्रमुख उपस्थिती मा. श्री. तानाजी कवडे सहनिबंधक, लेखापरीक्षण (से. नि ) पुणे तसेच मा. श्री. नारायण परजणे सहाय्यक निबंधक सहकारी संस्था श्रीगोंदा. मा. श्री. दत्तात्रय गावडे संस्थापक चेअरमन- महेश्वर मल्टी स्टेट व महेश्वर पतसंस्था, मा. श्री. अनिल भदागरे व्हा. चेअरमन - महेश्वर पतसंस्था, मा. श्री. एकनाथजी आळेकर संस्थापक चेअरमन - इंदिरा पतसंस्था श्रीगोंदा तसेच तालुक्यातील पतसंस्था पदाधिकारी, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश आर्थिक शिस्त पाळणे, जोखीम कमी करणे, नैतिकता आणि कामकाजामध्ये पारदर्शकता वाढविणे, तांत्रिक डिजिटल कौशल्ये विकसित करणे हा होता.

# संगमनेरमध्ये नगराध्यक्ष पदाचे तीन अर्ज बाद

**संगमनेर : (समर्थ गांवकरी)**

- नगरसेवक पदाचे अठरा अर्ज बाद;
- माघारीनंतर चित्र होणार स्पष्ट

संगमनेर नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी नगराध्यक्ष पदासाठी वीस अर्ज प्राप्त झाले होते, त्यापैकी तीन अर्ज छाननीमध्ये बाद झाले. तर नगरसेवक पदासाठी १७७ अर्ज प्राप्त झाले होते, त्यापैकी १८ अर्ज बाद झाले असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा प्रांताधिकारी अरुण उंडे यांनी दिली.

शहरातील यशवंतराव चव्हाण मध्यवर्ती प्रशासकीय भवनात मंगळवारी (दि.१८) अर्ज छाननी प्रक्रिया पार पडली.

यावेळी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून तहसीलदार धीरज मांजरे व मुख्याधिकारी दयानंद गोरे उपस्थित होते. या प्रक्रियेमध्ये नगराध्यक्ष पदासाठी सोळा उमेदवारांनी वीस अर्ज दाखल केले होते. त्यातील तीन अर्ज बाद झाल्याने १७ अर्ज शिल्लक राहिले आहे. तर नगरसेवक पदासाठी १६५ उमेदवारांनी १७७ अर्ज दाखल केले होते, त्यापैकी १८ बाद झाल्याने १५९ अर्ज शिल्लक राहिले आहे.

आता मंगळवारी अर्ज माघार घेण्यास मुदत आहे. त्यानंतरच निवडणुकीचे खरे चित्र स्पष्ट होणार आहे.

दरम्यान, संगमनेर सेवा समितीने उमेदवारांची अधिकृत घोषणा केली आहे. मात्र, महायुतीकडून अद्यापही अधिकृत उमेदवारांच्या नावाची घोषणा अथवा यादी प्रसिद्ध झालेली नाही.


## नेहरू मार्केट प्रश्नी

# आयुक्तांच्या भूमिकेला गाळेधारकांचा विरोध

- नगरमधील नेहरू मार्केट प्रश्नी आयुक्तांच्या भूमिकेला गाळेधारकांचा प्रकल्पाला विरोध नसून, फक्त ग्राऊंड फ्लोअरच्या गाळ्यांसाठी ठाम भूमिका -संजय झिंजे

**अहिल्यानगर: (समर्थ गांवकरी)**

अनेक वर्षांपासून रखडलेल्या नेहरू मार्केट संकुलाच्या नव्या उभारणीला अखेर महानगरपालिकेने कार्यारंभ आदेश देत गती दिली आहे. तळघर, तळमजला आणि तीन मजली असे एकूण चार मजली संकुल भाजी विक्रेते व व्यावसायिकांसाठी उभारले जाणार असून यात तळ मजल्यावर ७० ओटे व एकूण ६१ व्यावसायिक गाळे उपलब्ध होणार आहेत.



जुन्या गाळेधारकांचे पुनर्वसन करण्याची महापालिकेची योजना असली तरी तळघरात व इतर वरच्या मजल्यावर गाळे देण्याला नेहरू मार्केट गाळेधारक युनियनने तीव्र विरोध दर्शविला आहे. प्रकल्पाला विरोध नसून, फक्त ग्राऊंड फ्लोअरला गाळे मिळण्यासाठी ठाम भूमिका दर्शविण्यात आली आहे. युनियनचे अध्यक्ष व माजी नगरसेवक संजय झिंजे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे आयुक्तांच्या भूमिकेवर कठोर आक्षेप नोंदवला आहे.

युनियनचे म्हणणे आहे की, सर्व ७० ओटे आणि १४ मूळ गाळे हे फक्त ग्राऊंड फ्लोअरला देण्यात यावेत. कारण, "आम्ही सर्वजण पूर्वीपासून ग्राऊंड फ्लोअरवरच व्यवसाय करत आलो आहोत. त्यामुळे आमचा ऐतिहासिक हक्क अबाधित ठेवला पाहिजे," असे झिंजे यांनी स्पष्ट केले. महापालिकेने तळमजल्यावरील काही गाळे वरच्या मजल्यावर देण्याची शक्यता व्यक्त केल्याचा तीव्र निषेध करण्यात आला. "वरच्या मजल्यावर कुठेही भाजी बाजाराचे गाळे नसतात, मग आम्ही व्यवसाय कसा करणार?" असा सवाल युनियनने उपस्थित केला.

प्रसिद्धीपत्रकात आयुक्तांवर गंभीर आरोप करण्यात आले आहेत. झिंजे म्हणाले की, महापालिकेने भाजी विक्रेत्यांना कोणतेही पुनर्वसन निश्चित न करता सध्या जागा रिकामी करून घेतली. पत्रे ठोकून त्यांना रस्त्यावर आणले. त्यांच्या उपजीविकेवर गदा आली. हे आयुक्तांचे बेकायदेशीर कृत्य आहे."

युनियनने स्पष्ट केले की, प्रकल्पात दाखवलेल्या ६१ गाळ्यांशी १४ मूळ गाळ्यांचा काहीही संबंध नाही. हे १४ गाळे हे मुळ भाजी विक्रेत्यांचे असून, महापालिकेने त्यांना गाळे देण्याबाबत हायकोर्टात हमीपत्र दिले आहे. त्यामुळे हे गाळे त्यांना कन्स्ट्रक्शन कॉस्ट या दरातच दिले पाहिजे. हा आमचा कायदेशीर हक्क असून मागणी अजिबात गैर नाही, असे झिंजे यांनी नमूद केले.

संजय झिंजे यांनी आयुक्त हे राजकीय पुढाऱ्यांच्या अधिपत्याखाली काम करत आहेत. त्यामुळे स्वतंत्र निर्णय घेऊ शकत नाहीत. या वर्तनामुळे सर्व गाळेधारकांवर अन्याय होत असल्याचा आरोप देखील केला आहे. या संदर्भात मुख्यमंत्र्यांकडे तक्रार केली जाणार आहे. वेळप्रसंगी न्यायालयात देखील दाद मागितली जाणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे. आयुक्तांनी गाळे धारकांना गाळे देण्यासाठी लेखी भूमिका स्पष्ट जाहीर करावी. तडजोडीने प्रश्न न सोडवल्यास, "हुकूमशाही पद्धत खपवून घेतली जाणार नाही," असा ठाम इशारा युनियनने दिला आहे.

प्रकल्पाला कोणताही विरोध नाही. मात्र, भाजी मंडईसाठी राखीव असलेल्या या जागेवर मूळ भाजी विक्रेत्यांचे हक्क अबाधित राहावेत, आणि ग्राऊंड फ्लोअरवरच त्यांच्या गाळ्यांचे पुनर्वसन व्हावे, यासाठी संघटना प्रयत्नशील असल्याचे झिंजे यांनी म्हंटले आहे.

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
सहाय्यक निबंधक सहकारी संस्था जामखेड, कोर्ट गल्ली जामखेड, ता. जामखेड, जि. अहिल्यानगर
ई मेल – ar_jamkhed@rediffmail.com दुरध्वनी क्र. ०२४२१–२२१४०१

जा.क्र. / सनिजा / वि.३ / विवेकानंद अपसेट / जाहीर समन्स / सन २५ दि. /११/२०२५

जाहीर समन्स

विशेष वसुली व विक्री अधिकारी, विवेकानंद ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्यादित जामखेड तालुका जामखेड जिल्हा अहिल्यानगर या संस्थेने त्यांचे थकबाकीदार/कर्जदार/जामीनदार यांच्या विरुद्ध जप्त केलेल्या स्थावर मालमत्तेच्या अपसेट प्राईज ठरवुन मिळणेबाबतचा प्रस्ताव या कार्यालयास प्रस्ताव दाखल केला आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने या कार्यालयाने दिनांक ०१/०९/२०२५ व २५/०९/२०२५ रोजीच्य सुनावणी नोटीसन्वये दिनांक २२/०९/२०२५ व १३/१०/२०२५ या दिवशी सुनावणी ठेवण्यात आलेली होती. सदर सुनावणीच्या नोटिसा संबंधितांना रजिस्टर पोस्टाने पाठविण्यात आलेल्या होत्या, परंतु सदरच्या नोटीशीची बजावणी झालेली नाही किंवा जाब देणार सुनावणीस हजर राहिलेले नाहीत. सबब नैसर्गिक न्याय तत्त्वाच्या दृष्टीने सुनावणीचे जाहीर समन्स दैनिक वर्तमान पत्रात प्रसिद्ध करून त्याची सुनावणी दिनांक ०४/१२/२०२५ रोजी दुपारी ०१–०० वाजता सहाय्यक निबंधक सहकारी संस्था जामखेड यांच्या कार्यालयात ठेवण्यात येत आहे. सदर सुनावणीचे दिवशी जाब देणार हे हजर राहिले नाहीत किंवा म्हणणे सादर केले नाही किंवा सादर केलेले म्हणणे समाधानकारक वाटले नाही तर संस्थेने मागणी केल्याप्रमाणे महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये पुढील कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

अपसेट प्रकरणांबाबतचा तपशील खालीलप्रमाणे

| मालमत्ता धारकाचे नाव | जप्त केलेल्या मालमत्तेचे वर्ण / तपशील | | दुय्यम निबंधक यांनी केलेले मुल्यांकन रुपये | शासनमान्य मुल्यांकन कार यांनी केलेल्या मुल्यांकन |
|---|---|---|---|---|
| | गट नं. / मालमत्ता क्रमांक | क्षेत्र हे. आर/ चौ.फुट | | |
| श्री. शांतीलिंग केदारी नंदुर्गे, रा. जवळा, जामखेड | मालमत्ता क्र. ५४३/४ | ३७० चौ.फुट | ०५,२१,००५/– | ०४,७६,१००/– |
| सौ. रंगुबाई पोपट पारडे रा. दिघोळ, ता.जामखेड | मालमत्ता क्र. १२४ | २५० चौ.फुट | ०१,७१,०६३/– | ०१,५९,९००/– |
| श्री. राजेंद्र गणपत जगताप रा. बटेवाडी, ता.जामखेड | मौजे रत्नापुर येथील गट नं. ३९०<br>३९९/ अ पैकी<br>३९९/ब पैकी<br>४७५ पैकी | मौजे रत्नापुर येथील ०.०४.५० हे. आर.<br>०.५९ हे. आर<br>१.०६ हे आर<br>१.२६ हे. आर | ०५,१३,६००/–<br>०५,००,३८०/–<br>०२,४८,२२०/–<br>०३,४०,४००/– | ०४,६०,३००/–<br>०४,४९,९००/–<br>०२,२३,१००/–<br>०३,०६,३००/– |
| नामदेव निवृत्ती नंदुर्गे रा.जवळा, ता. जामखेड | मालमत्ता क्र. २५१ | ३३६ चौ.फुट | ०३,५०,५६९/– | ०३,१५,४२३/– |
| श्री. राजेंद्र गणपत जगताप रा. दिघोळ, ता. जामखेड | मालमत्ता क्र.१५२९ | ३०.८० चौ.मी | ९९,७९२/– | ८९,७००/– |

दि. १९/११/२०२५
ठिकाण – जामखेड

(दिलीप तिजोरे)
सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, जामखेड

# शाळांच्या वेळेत बदल जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश



**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

जिल्ह्यातील काही भागांत बिबट्यांचे हल्ले वाढत आहेत. पारनेर, कोपरगाव, संगमनेर, राहुरी, अकोले, अहिल्यानगर तालुक्यांमध्ये अशा घटना घडल्या आहेत. शालेय विद्यार्थ्यांचा या हल्ल्यात मृत्यू झाला आहे.

यामुळे बिबट्या प्रवण आपत्ती क्षेत्रातील शाळांच्या वेळेत सकाळी ९.३० ते दुपारी ४ असा बदल करण्यास परवानगी देण्यात आली आहे. जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी तसे आदेश दिले आहेत. जिल्ह्यातील सर्व माध्यमाच्या व सर्व व्यवस्थापनाच्या शाळांनी शाळा व्यवस्थापन समिती, शाळा समितीची मंजूरी घेवून वेळेत बदल करावा, असे आदेशात नमूद केले आहे.

जिल्ह्यामध्ये लहान मुलावरील बिबट्यांच्या हल्ल्यांच्या घटना पारनेर, अहिल्यानगर तालुक्यांमध्ये घडल्या आहेत. शालेय विद्यार्थी यामध्ये जखमी व मयत झाले आहेत. दिवसेंदिवस बिबट्यांच्या वाढत्या हल्ल्यांच्या घटना लक्षात घेता विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी शाळेच्या वेळेत बदल करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. जिल्ह्यातील बहुतांश शाळांमधील विद्यार्थी पायी शाळेत येतात व शाळा सुटल्यावर पायी घरी जातात. रस्त्याच्या कडेने ऊस, जंगल, डोंगराळ असे बिबट प्रवण आपत्ती क्षेत्र आहे. सध्या ऊसतोडीमुळे उसाचे क्षेत्र कमी होत असल्याने बिबट्यांचे हल्ल्याचे प्रमाण वाढले आहे.

तसेच सद्यस्थितीत हिवाळा ऋतूमुळे सायंकाळी लवकर अंधार पडत असल्याने विद्यार्थ्यांची सुरक्षितता धोक्यात आली आहे. बिबट्यांच्या हल्ल्यामुळे विद्यार्थ्यांना धोका पोहचू नये यासाठी शाळांच्या वेळेत सकाळी ९.३० ते दुपारी ४ असा बदल शाळा व्यवस्थापन समिती/शाळा समितीची मंजूरी घेवून करण्यास परवानगी देण्यात आली आहे.

तसेच शाळास्तरावर सकाळच्या परिपाठात सुरक्षिततेबाबत सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे, शाळास्तरावर पालक मेळावे घेऊन शाळेत येताना व शाळा सुटताना पाल्यांना स्वतः घेऊन जाणेबाबत पालकांना कळविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.



**जुन्नर तालुका :** रॉयल एज्युकेशन इंग्लिश स्कूल ओतूर तर्फे चिमुकल्या विद्यार्थ्यांनी बुधवार दि:-१९ नोव्हेंबर रोजी पोस्ट ऑफिस व्हिजिट करून टपाल सेवा कशी काम करते याची जाणीव करून घेतली या उपक्रमात इयत्ता तिसरी व चौथीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांना रोजच्या जीवनातील पोस्ट विभागाचे कार्य,त्याचे सामाजिक महत्त्व व भविष्यातील करियर म्हणून उपलब्ध संधी याबाबत प्रत्यक्ष अनुभवातून जाणून घेतली.

## थोडक्यात बातम्या...




### श्री. अशोक भवारी यांना उल्लेखनीय कामगिरीबद्दल सन्मान!

नाशिक (स. गांवकरी) : नाशिक जिल्हा परिषद (ग्रामपंचायत विभाग) यांच्यावतीने पं.स. सिन्नरचे गटविकास अधिकारी श्री अशोक भवारी यांना सन २०२४-२५ या आर्थिक वर्षातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल सन्मानित करण्यात आले. गटप्रमुख म्हणून विविध योजना आणि अभियानांच्या प्रभावी अंमलबजावणीत त्यांनी केलेल्या उत्कृष्ट कार्याचा गौरव म्हणून जिल्हा परिषद, नाशिक यांनी सन्मानपत्र प्रदान केले. ग्रामीण विकास, शासकीय योजनांची अंमलबजावणी, तसेच जनसहभाग वाढविण्यासाठी त्यांनी घेतलेल्या पुढाकारांचे विशेष कौतुक या प्रसंगी करण्यात आले. या सन्मानाने पं.स. सिन्नरच्या कार्यक्षमतेत आणि विकास प्रक्रियेत नवचैतन्य निर्माण होणार असल्याचे मत ग्रामपंचायत विभागातील अधिकाऱ्यांनी व्यक्त केले. श्री अशोक भवारी यांच्या यशाबद्दल सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव होत असून पुढील जबाबदाऱ्यांसाठीही त्यांनी अशीच प्रगती साधावी, अशा शुभेच्छा व्यक्त केल्या जात आहेत.

### दिपेशसिंह परदेशी यांचा शिवसेना सामन्यवक व सदस्य पदाचा राजीनामा



शिवनेरी (स. गांवकरी) : जुन्नर नगरपरिषदेचे माजी उपनगराध्यक्ष दिपेशसिंह परदेशी यांनी आपल्या जुन्नर शहर शिवसेना समन्वयक व सदस्य पदाचा राजीनामा जुन्नर तालुका प्रमुख योगेश पाटे यांच्याकडे दिला. परदेशी हे २०१६ साली झालेल्या जुन्नर नगरपरिषद निवडणुकीत प्रभाग क्रमांक ७ मधून शिवसेना पक्षाकडून निवडून आले होते. त्या नंतर त्यांनी नगरपरिषदेत गट नेता , पाणी सभापती , उपनगराध्यक्ष अशी पदे भूषवित प्रभाग आणि शहराच्या विकासाच्यादृष्टीने अनेक विकास कामे केली. " शिवसेनेत झालेल्या दुफळी नंतर परदेशी यांनी आमदार शरद सोनवणे यांची साथ देत त्यांच्या सोबत एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत " काम केले . नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत आमदार शरद सोनवणे हे अपक्ष निवडणूक लढले तरी दिपेशसिंह परदेशी यांनी त्यांची साथ सोडली नाही . विधानसभा निवडणुकीत शहरातून जवळपास पाच हजार मतांचे लीड मिळवून देण्यात त्यांचा मोठा वाटा राहिला.असे २०२५ च्या या जुन्नर नगरपरिषद निवडणुकीत आमदार शरद सोनवणे यांनी विश्वासात न घेता प्रक्रियेतून लांब ठेवल्याने स्वाभिमान दूखावल्याने त्यांनी भारतीय जनता पक्षाच्या वतीने प्रभाग क्रमांक ८ मधून आपला उमेदवारी अर्ज दाखल केल्याचे सांगितले . त्यामुळे त्यांनी कोणत्याही नेत्यावर टीका टिपणी न करता आपल्या समन्वयक पदाचा आणि शिवसेना सदस्य पदाचा राजीनामा तालुका प्रमुख योगेश (बाबू) पाटे यांच्याकडे सुपुर्द केला आहे.

# डुंबरवाडी टोल नाक्यावर महिला कर्मचाऱ्यांकडून नागरिकांना आरेरावी व दादागिरी सुरूच

**जुन्नर : (समर्थ गांवकरी)**



जुन्नर तालुक्यातील डुंबरवाडी टोल नाका कायम चर्चेत राहिला. या अगोदर अनेकदा आसपासच्या नागरिकांना दमदाठी,दादागिरी आणि वेळप्रसंगी मारझोड देखील करण्यात आली आहे. मागील काही महिन्यापूर्वी एका प्रतिष्ठित राजकीय पुढाऱ्यावर व त्यांच्या कार्यकर्त्यांना सुद्धा दादागिरी व मारझोड करण्यात आली होती. लोकशाहीचा चौथा स्तंभ असणाऱ्या पत्रकारांना सुद्धा यांच्या दादागिरीला समोरे जावे लागत आहे. या रस्त्याने प्रवास करण्याचे म्हटले की सर्वसामान्य नागरिकांना भीती वाटू लागली आहे. येथील दादागिरीला आणि दमदाटीला अभय डुंबरवाडी चे पोलीस पाटीलच देत आहे. नेमके पोलीस पाटलांचे कार्य काय शासन पोलीस पाटलांना मानधन देते की टोल प्रशासन हा प्रश्न अनुत्तरीतच आहे.

हाच टोल नाका आमदार शरद सोनवणे यांनी निवडणुकीनंतर बंद केला होता मग सुरू होण्यामागचे कारण एका सामाजिक कार्यकर्त्यांनी समोर आणले होते. परंतु यावर आमदार सोनवणे यांनी कुठलीही प्रतिक्रिया दिली नाही. मग प्रतिक्रिया देण्यामागे त्यांची भूमिका दुटप्पी राहिली की काय ?

नगर - कल्याण महामार्गाचे काम अतिशय संत गतीने व दर्जाहीन सुरू आहे. या तालुक्याच्या प्रतिनिधींनी तोंडावर बोट का ठेवले आहे. हे समजणे इतकी जुन्नर तालुक्यातील जनता दूधखुळी मुळीच नाही. निवडणुकीच्या काळामध्ये शरद सोनवणे यांनी दिलेला शब्द म्हणजे मी डुंबरवाडी टोल नाका बंद करणार. निवडणुकाही ही झाल्या शरद सोनवणे आमदार ही झाले. पण टोल नाका मात्र सुरूच राहिला. या टोल नाक्यावर हस्तक्षेप करणाऱ्या पोलीस पाटलावर उपविभागीय अधिकारी गोविंद शिंदे कारवाई करणार का असा सवाल जुन्नर तालुक्यातील संतप्त नागरिक करीत आहे. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई यांच्या वतीने पोलिस पाटील व महामार्ग प्रशासनावर कारवाई करण्यासाठी राज्यभर आंदोलन छेडणार असल्याची माहिती पत्रकार संघाच्या वतीने देण्यात आली आहे. टोल नाका परिसरात टोल आकारणीचे फलक सुव्यवस्थेत दिसत नाही. कर्मचाऱ्यांना समुपदेशनाची गरज आहे त्याचबरोबर टोलनाका प्रशासनाने दिल्या जाणाऱ्या सोयी सुविधा नागरिकांपर्यंत पोहोचत नाही. रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे होत असतानाही टोल वसुली मात्र दादागिरीत सुरूच आहे. डुंबरवाडी टोल नाक्यामुळे ओतूर परिसराची बदनामी होताना दिसत आहे. देशाचे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी ५५ किलोमीटर च्या आतील टोल नाके बंद करण्याचे आदेश राज्य शासनाला दिले होते.

## ४ विद्यार्थ्यांची विभागीय स्पर्धेसाठी निवड

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**



शालेय शिक्षण क्रीडा विभाग, पुणे जिल्हा क्रीडा परिषद,जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय,पुणे व कारेश्वर इंग्लिश मिडीयम स्कूल,कारेगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय सायकलिंग स्पर्धा कारेगाव तालुका शिरूर या ठिकाणी दि:-१८ नोव्हेंबर २०२५ रोजी संपन्न झाल्या.या स्पर्धेत ग्राम विकास मंडळ ओतूर संचलित चैतन्य विद्यालय ओतूरच्या ८ विद्यार्थ्यांनी यश मिळवले व त्यातील ४ खेळाडूंची अहिल्यानगर या ठिकाणी होणाऱ्या विभागीय पातळी वरील स्पर्धेसाठी निवड झाली.अशी माहिती विद्यालयाचे क्रीडा विभाग प्रमुख अमित झरेकर व विद्यालयाच्या मुख्याध्यापिका राजश्री भालेकर यांनी दिली.

## ज्येष्ठ नेते डॉ भानुदास डेरे यांना अटक : शैक्षणिक क्षेत्रात खळबळ

- ज्यांनी जन्म दिला त्यांनी जेलमध्ये जाण्यास प्रवृत्त केले या जीवनात दुसरे दुःख काय

**संगमनेर : (समर्थ गांवकरी)**

शहराजवळील गुंजाळवाडी शिवारातील संजीवन हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटरमध्ये ही जागा खाली करण्यासह विभक्त राहत असलेल्या पत्नीला साथ देत असल्याच्या रागातून डॉ. भानुदास डेरे यांनी मंगळवारी (दि.18) सायंकाळी साडेसात वाजेच्या सुमारास थेट चारचाकी वाहन रुग्णालयात घालून कर्मचाऱ्यांना जीवे ठार मारण्याचा प्रयत्न करत रुग्णालयाचे नुकसान केले. याबाबत त्यांची कन्या डॉ. एकता वाबळे यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पहाटेच शहर पोलिसांनी त्यांना अटक केली. यामुळे राजकीय, शैक्षणिक व वैद्यकीय क्षेत्रात एकच खळबळ उडाली आहे.



याबाबत संगमनेर शहर पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी, की मंगळवारी सायंकाळी सामान्यपणे रुग्णालयाचे कामकाज सुरू असताना डॉ. भानुदास डेरे आपली अलिशान कार (क्र.एमएच.17, डीजे.1419) स्वतः चालवत आले आणि थेट रुग्णालयातील प्रतीक्षा कक्षात वाहन घुसवून स्वागत कक्षाचा कर्मचारी मयूर राजेंद्र अभंग (रा. दाढ बु.) याच्या अंगावर घालून जीवे मारण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्याने प्रसंगावधान राखल्याने वाचला. यामध्ये प्रतीक्षा कक्षाच्या काचा फुटून मोठे नुकसान झाले.

या घटनेत डॉ. डेरे यांच्या सोबत असलेला त्यांचा स्वीय सहाय्यक सोमनाथ पवार यानेही कर्मचाऱ्यांना दमदाटी करत शिवीगाळ केली. हे सर्व सुरू असताना त्यांच्या कन्या व रुग्णालयाच्या संचालिका डॉ. एकता वाबळे तेथे आल्या आणि त्यांनी वडिलांना निघून जाण्यास सांगितले. परंतु, त्यांनी शिवीगाळ करत जागा खाली करण्याची धमकी देत आरडाओरड सुरूच ठेवला. डॉ. वाबळे यांनी पोलिसांना बोलावण्याचा इशारा दिल्यानंतर डॉ. डेरे आपला स्वीय सहाय्यक पवार याच्यासह निघून गेले. याप्रकरणी डॉ. एकता जगदीश वाबळे (रा. वरद बंगला, गंगासृष्टी, संगमनेर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन शहर पोलिसांनी डॉ. भानुदास गेणुजी डेरे (रा. घोडेकर मळा, संगमनेर) व सोमनाथ पवार (पूर्ण नाव व पत्ता माहीत नाही) या दोघांवर भारतीय न्यायसंहितेचे कलम 109, 351(3), 352, 3(5) नुसार गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक समीर बारवकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक श्रीकांत सावंत हे करत आहे. दरम्यान, डॉ. डेरे यांना पहाटेच अटक केली आहे.

# अकोले तालुक्यात बिबट्या संरक्षणाबाबत जनजागृती मोहीम!

- ब्राम्हणवाडा वनपरिक्षेत्रात नागरिकांना सावधगिरीचे आवाहन!

**अकोले : (समर्थ गांवकरी)**



अकोले तालुक्यातील ब्राम्हणवाडा परिसरात बिबट्याच्या वाढत्या हालचालींचा विचार करता नागरिकांच्या सुरक्षेसाठी वनविभागाकडून जनजागृती मोहीम राबविण्यात आली. यावेळी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी ग्रामस्थांना विविध काळजीसूचना देत जागरूक राहण्याचे आवाहन केले. वनपाल सुनील शिर्के, वनरक्षक सुनिल कुकडवाल, वनरक्षक दीपक शिंदे तसेच वनमजूर शिवाजी लांडगे यांनी नागरिकांशी संवाद साधत पुढील महत्वाच्या खबरदारी सूचना सांगितल्या :

महत्वाच्या खबरदारी सूचना :

रात्री एकटे बाहेर पडणे टाळा — बिबट्या रात्री जास्त सक्रिय असतो. आवश्यक असल्यास टॉर्च व काठीसोबतच मोठा आवाज करा, म्युझिक लावा.

दरवाजे व्यवस्थित लॉक करा — अंगणात किंवा घराबाहेर उघड्यावर झोपणे टाळा. लहान मुले व वृद्धांची काळजी घ्या — त्यांना रात्रीच्या वेळी घराबाहेर किंवा एकटे सोडू नका. पाळीव प्राण्यांना बंदिस्त जागी ठेवा — सुरक्षित गोठा किंवा शेडमध्ये बांधणी करा. घराच्या परिसराची स्वच्छता ठेवा — झुडुपे, दाट झाडे व कचरा परिसरात ठेवू नका. कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करा, अन्यथा भटक्या कुत्र्यांची संख्या वाढते आणि त्यामुळे बिबट्या आकर्षित होतो.

## सिडको क्षेत्रीय कार्यालय सुशोभिकरणाचे काम रखडले

**नवीन नांदेड : (समर्थ गांवकरी)**

ना वा मनपा आयुक्त डॉ.महेश कुमार डोईफोडे यांच्या आदेशानुसार सर्वच क्षेत्रीय कार्यालय सुशोभिकरणाचे कामे हाती घेण्यात आले होते परंतु सुशोभिकरण साठी देण्यात आलेला निधी चे कमतरता पडल्या मुळे क्षेत्रीय कार्यालय सिडको येथे अर्धवट कामामुळे गेल्या अनेक दिवसांपासून काम रखडलेले असल्यामुळे संबंधीत अधिकारी व कर्मचारी यांच्या सह नागरीकांना नाहक त्रास सहन करावा लागत असुन बांधकाम त्वरित चालू करावे यासाठी सहाय्यक आयुक्त डॉ. मिर्झा बेग यांनी आयुक्त यांच्या कडे लेखी पत्राद्वारे कळविले आहे. नावा मनपाच्या वतीने शहरातील सहा क्षेत्रीय कार्यालय येथे गेल्या सात ते आठ महिन्यांपूर्वी सुशोभिकरण कामाचा शुभारंभ करण्यात आला होता यावेळी क्षेत्रीय कार्यालय सुसज्ज सह सहाय्यक आयुक्त कार्यालय, नाव परिवर्तन विभाग, लेखा विभाग , जन्म मृत्यू यासह वसुली लिपीक कक्ष, स्वागत कक्ष यांच्या समावेश होता यासाठी क्षेत्रीय कार्यालय निधी उपलब्ध करून देण्यात आला होता.

# किनवट नगर परिषद निवडणूक उमेदवारांची वैध यादी जाहीर; राजकीय घडामोडींना वेग, युती आणि बंडखोरीमुळे चित्र रंजक

**किनवट : (समर्थ गांवकरी)**



किनवट नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ ची रणधुमाळी आता अंतिम टप्प्याकडे झुकत असून, निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी (नमुना ४, नियम १३ अन्वये) अध्यक्षपद आणि विविध प्रभागांसाठी वैधरित्या नामनिर्दिष्ट उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. छाननी प्रक्रियेनंतर अध्यक्षपदासाठी १५ तर विविध प्रभागांमध्ये अनेक उमेदवारांचे अर्ज वैध ठरले आहेत. मात्र, उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत २१ नोव्हेंबर असल्याने त्यानंतरच लढतीचे खरे चित्र स्पष्ट होणार आहे. अध्यक्षपदासाठी १५ उमेदवार रिंगणात किनवट नगर परिषदेच्या अध्यक्षपदासाठी एकूण १५ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले आहेत. यामध्ये प्रामुख्याने भाजपच्या पुष्पा आनंद मच्छेवार आणि महाविकास आघाडीच्या (राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गट व शिवसेना उबाठा) उमेदवार सौ. सुजाता विनोद यंडुलवार यांच्यात थेट लढत आहे. तरी इतर ही उमेदवारांचाही समावेश आहे.

राजकीय समीकरणे आणि धक्कातंत्र या निवडणुकीत राजकीय पक्षांच्या निष्ठा आणि युतीमध्ये मोठे बदल पहायला मिळत आहेत: भाजप व काँग्रेस: भाजपने स्वतंत्ररीत्या ही निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला असून, काँग्रेसने देखील एक अध्यक्षपद आणि १२ जागांवर आपले उमेदवार उभे केले आहेत.

महाविकास आघाडी: राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) यांनी आघाडी केली असून, त्यांच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार सौ. सुजाता यंडुलवार या आहेत.

पक्ष प्रवेशाचा धक्का: भाजपचे श्रीनिवास यादवराव नेम्मानीवार यांनी अचानक राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षात प्रवेश केला आहे. दुसरीकडे, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे माजी नगराध्यक्ष साजिद खान यांनी ऐनवेळी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षासोबत जाण्याची भूमिका घेतल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

प्रभाग क्र. ४ मध्ये हायव्होल्टेज ड्रामा माजी नगराध्यक्ष साजिद खान यांनी भाजपसोबत स्थानिक युती करत राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) गटासाठी ९ जागा मिळवल्या आहेत. याचा मोठा फटका प्रभाग क्रमांक ४ मध्ये बसला आहे.

प्रभाग ४ मध्ये ऐनवेळी उमेदवार बदलल्याने उमेदवार शेख अयाज यांच्या पतीला हृदयविकाराचा तीव्र धक्का बसला असून, त्यांच्यावर खासगी रुग्णालयात पचार सुरू आहेत.

तिकीट वाटपाचा गोंधळ: या प्रभागातील माजी नगरसेवक शेख अफरोज आणि कैलास भगत यांनी भाजपकडे उमेदवारी मागितली होती. मात्र, साजिद खान यांनी जागा आपल्याकडे खेचल्याने भाजपच्या इच्छुकांची कोंडी झाली. अखेर, शेवटच्या क्षणी या दोन्ही माजी नगरसेवकांनी 'राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार' गटाची उमेदवारी मिळवण्यात यश मिळवले आहे.

माजी उपाध्यक्ष जिल्हा परिषद नांदेड प्रकाश गब्बा राठोड यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षातून माजी नगराध्यक्ष साजिद खान यांची हकालपट्टी केल्याचे पत्र समाज माध्यमावर प्रसारित केले ज्यामध्ये पक्ष विरोधी कारवाया, भाजपा सोबत छुपी युती तसेच उमेदवारांची पळवापळव असे मुद्दे समाविष्ट करून सदर अहवाल खा. शरदचंद्र पवार यांना सादर करणार असल्याचे नमूद केले.

माजी नगराध्यक्ष साजिद खान यांनी यावर भाष्य करताना सांगितले की त्यांनी रीतसर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्ष सोडून राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष मध्ये प्रवेश केला आहे.

मुस्लिम मतदारांचा रोष आणि झरीना खान यांची भूमिका

किनवट शहरात जवळपास १२,००० मुस्लिम मतदार असूनही प्रमुख पक्षांनी मुस्लिम समाजाला नगराध्यक्षपदाची उमेदवारी न दिल्याने समाजात रोष निर्माण झाला आहे. साजिद खान यांच्या पत्नी, झरीना खान यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) गटाकडून अर्ज दाखल केला आहे. आता त्या युती धर्म पाळून माघार घेतात की निवडणूक लढवतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. त्यांनी निवडणूक लढवल्यास निकालात मोठी कलाटणी मिळू शकते.

बंडखोरांचे आव्हान

भाजपसह इतर पक्षांमध्येही बंडखोरांनी अर्ज दाखल केल्याने पक्षश्रेष्ठींसमोर त्यांना शांत करण्याचे मोठे आव्हान उभे राहिले आहे. २१ तारखेला अर्ज माघारीनंतरच किनवटचा 'किंग' कोण होणार, याचे चित्र स्पष्ट होईल.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# हायस्पीड रेल्वे स्टेशन आराखड्याला दिवा भाजपचा विरोध

**ठाणे, दिवा : (समर्थ गांवकरी)**

केंद्र सरकारचा महत्वाकांक्षी प्रकल्प असलेल्या बुलेट रेल्वे प्रकल्पाचे काम ठाणे महापालिका क्षेत्रातील म्हातार्डी येथे उभारण्यात येत आहे. बुलेट रेल्वे स्थानकाकरीता स्थानिक क्षेत्राचा विकासही करण्याचा निर्णय पालिकेने घेतला होता. त्यासाठी जपान इंटरनॅशनल कॉर्पोरेशन एजन्सी (जेआयसीए) च्या मार्गदर्शनाखाली बुलेट रेल्वे स्थानकासाठी स्थानिक क्षेत्र विकास आराखडा तयार करण्यात आला आहे. या क्षेत्रात ठाणे महापालिका क्षेत्रातील दातिवली,



म्हातार्डी, बेतावडे, आगासन या गावासह कल्याण-डोंबिवली महापालिका क्षेत्रातील आयरे, कोपर, भोपर, नांदिवली (पंचानंद), काटई आणि उसरघर या भागांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे या भागातील शेतकऱ्यांच्या जमीनी प्रकल्पात बाधित होणार असून त्यास शेतकऱ्यांनी विरोध करण्यास सुरूवात केली आहे. काही दिवसांपुर्वी ठाकरे शिवसेनेसह शिंदे शिवसेनेने विरोध दर्शवीला होता आता त्यापाठोपाठ दिवा भाजपने देखील विरोध दर्शवीला आहे. दिवा भाजपच्या सौ. रेश्मा नरेश पवार यांनी देखील विरोध दर्शवीला असून बाधितांना विश्वासात न घेता निर्णय घेणे हे पूर्णतः हा चुकीचे असल्याचे सौ. रेश्मा पवार यांनी स्पष्ट केले आहे. प्रकरणी या प्रकल्पाविरोधात पालिकेत दोन हजारांपेक्षा तक्रारी नोंदविल्या गेल्या आहेत.

ठाणे हायस्पीड (बुलेट) रेल्वे स्थानकासाठी स्थानिक क्षेत्र विकास आराखडा तयार करण्यात आला असून याविरोधात हरकती आणि सुचना नोंदविण्यासाठी १७ नोव्हेंबर ही अंतिम तारीख देण्यात आली होती. त्यामुळे शेवटच्या दिवशी ठाणे महापालिका मुख्यालयात दिवा भागासह आजूबाजूच्या अनेक स्थानिक नागरिकांनी रांगा लावून तक्रारी नोंदविल्या. यामुळे पालिकेच्या तळमजल्यावरील नागरी सुविधा केंद्राबाहेर नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. या प्रकल्पाचा आराखडा तयार करताना शेतकऱ्यांना विश्वासात घेतलेले नाही. याआधी बुलेट रेल्वे, दिवा-वसई, मध्य रेल्वे आणि इतर प्रकल्पांसाठी शेतकऱ्यांनी जमीनी दिलेल्या आहेत. आता पुन्हा या प्रकल्पाला शेतकऱ्यांनी जमिन दिली तर ते भुमीहीन होतील. त्यामुळे शेतकऱ्यांना विश्वासात घेऊनच प्रकल्प राबविणे गरजेचे असून बाधित सातबारा धारकांची लिखित हरकत ऐकून सुनावणी घ्यावी व आमचे मत आम्हांला मांडण्याची संधी देण्यात यावी तसेच आम्हाला अवगत न करता कोणतीही कार्यवाही करू नये असे दिवा भाजपच्या सौ. रेश्मा नरेश पवार यांनी स्पष्ट केले.



ठाणे, दिवा : दिव्यात सिमेंट मिक्सर ट्रकखाली आल्याने पादचाऱ्याच्या दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. दिवा शिळफाटा रोडवर दिवा मोहत्सव मैदानाजवळील तिरुपती हार्डवेअर दुकानासमोर रस्त्याने चालत असलेले गणेश परब रा. रूम नं ०५, चाळ नं ०१, गणेश सदन चाळ, प्रेरणा टॉवरच्या समोर दिवा पूर्व यांना सिमेंट मिक्सर ट्रक (MH 05 DK 2100) निष्काळजीपणे चालकाने ट्रक चालवल्यामुळे गाडीखाली आल्याने गंभीर जखमी झाला होता प्रसंगी वेळेवर कोणतीही वैद्यकीय मदत न करता घटनास्थळावरून पळून गेला होता.

## थोडक्यात बातम्या...



### हिराबाई घाडगे यांचे वृद्धापकाळाने निधन

अहिल्यानगर (स. गांवकरी) : भिंगार येथील रहिवाशी हिराबाई रामचंद्र घाडगे यांचे वृद्धापकाळाने निधन झाले त्या ८२ वर्षाच्या होत्या. भिंगार येथील स्मशानभूमित त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले यावेळी मोठा जनसमुदाय उपस्थित होता. त्या अत्यंत धार्मिक,मनमिळावू स्वभावाचे होत्या. त्यांचे निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. त्यांचे मागे मुलगा, सुन, २ विवाहित मुली, नातवंडे असा परिवार आहे. भिंगार येथील प्रख्यात ज्योतिषीचार्य तुषार घाडगे यांच्या त्या मातोश्री होत.

### कंधार नगराध्यक्षपदासाठी तीन अर्ज तर सदस्य पदासाठी २० अर्ज बाद

कंधार (स. गांवकरी) : नामनिर्देशन पत्र छाननीत मंगळवारी कंधार मध्ये अध्यक्षपदाचे तीन तर सदस्य पदाचे २० असे एकूण २३ अर्ज अपात्र ठरविण्यात आले. यात ए बी फार्म नसणे, सारखेच सूचक असणे, तीन अपत्य असणे या कारणाचा समावेश आहे. अध्यक्ष पदासाठी आठ अर्ज होते. त्यातील तीन अर्ज बाद ठरले आहेत. सदस्य पदासाठी एकूण १२० अर्ज भरण्यात आले होते. छाननीत २० अर्ज अपात्र ठरले आहेत. २१ नोव्हेंबर ही अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख असून त्या दिवशी नगरपरिषद निवडणुकीत कोण आहे, कोण नाही याचे चित्र स्पष्ट होणार आहे. तरी नामनिर्देशन पत्र मागे घेण्याचा कालावधी नामनिर्देशन पत्र छाननी नंतर ते २१ नोव्हेंबर २०२५ दुपारी ३ वाजेपर्यंत राहील व त्यानंतर मा. राज्य निवडणूक आयोगामार्फत नेमून दिलेप्रमाणे पुढील निवडणूक कार्यक्रम राबविण्यात येईल. अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी रामेश्वर गोरे यांनी दिली.

### नगराध्यक्ष पदासाठी चार उमेदवार

कंधार (स. गांवकरी) : दि १८ नोव्हेंबर रोजी, नामनिर्देशन पत्र छाननी करण्याच्या दिवशी निवडणूक निर्णय अधिकारी, नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ यांच्या कक्षामध्ये राज्य निवडणूक आयोग यांच्या वेळोवेळी प्राप्त झालेल्या आदेशानुसार, नगराध्यक्ष पदाची उमेदवार, सूचक तसेच नगरसेवक पदासाठीचे उमेदवार, सूचक यांना बोलावून प्रभागनुसार नामनिर्देशन फॉर्म यांची छाननी करण्यात आली. यावेळी मा. निवडणूक निर्णय अधिकारी रामेश्वर गोरे यांनी प्रत्येक अपात्र करण्यात आलेल्या नामनिर्देशन पत्राकरिता लागू असलेले कारण जाहीर केले व त्यांचा फॉर्म अपात्र झाला म्हणून कळविले. सदरील छाननी दरम्यान नगराध्यक्ष पदासाठी आलेल्या एकूण ८ नामनिर्देशन पत्रापैकी ४ नामनिर्देशनपत्र अपात्र झाली असून ४ नाम निर्देशनपत्र पात्र झाली आहेत. तर नगरसेवक पदासाठी आलेल्या एकूण १२० नामनिर्देशक पत्रापैकी २० नामनिर्देशनपत्र अपात्र होऊन १०० नामनिर्देशन पत्र पात्र झाली आहेत. वैधरित्या नामनिर्देशित केलेल्या उमेदवारांची यादी प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून तीन दिवसाच्या आत जिल्हा न्यायाधीशा यांचेकडे उमेदवारास अपील करता येईल. तरी नामनिर्देशन पत्र मागे घेण्याचा कालावधी नामनिर्देशन पत्र छाननी नंतर ते २१ नोव्हेंबर दुपारी ३ वाजेपर्यंत राहील व त्यानंतर मा. राज्य निवडणूक आयोगामार्फत नेमून दिलेप्रमाणे पुढील निवडणूक कार्यक्रम राबविण्यात येईल. अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी रामेश्वर गोरे यांनी दिली. नगराध्यक्ष पदासाठी शहाजी नळगे ( कॉंग्रेस), स्वप्नील पाटील लुंगारे ( राष्ट्रवादी कॉंग्रेस अजीत पवार गट ) गंगाप्रसाद यन्नावार ( भाजपा ), चेतन भाऊ केंद्रे ( अपक्ष ) अशी चार अर्ज छाननी अंती अंतीम झाले आहेत . दरम्यान अर्ज उचलून घेण्याच्या दिवशी म्हणजे २१ नोव्हेंबर रोजी खऱ्या अर्थाने निवडणूक रिंगणात कोण कोण असेल हे नक्की होईल.



### अवैध वाळू चोरी करणाऱ्याना टाकळी येथील तलाठी यांचा आशिर्वाद का ?

नायगाव (स. गांवकरी) : नायगाव तालुक्यातील बरबडा व सर्कल अंतर्गत असलेल्या गावांतील मागील काही दिवसांपासून रात्रीच्या वेळी व दिवसा वाळू , चोरी करणाऱ्याना बरबडा व टाकळी येथील तलाठी यांचा आशिर्वाद आहे अशी चर्चा दपक्या आवाजात सुरू आहे . उमरी तालुक्यातील व ईळेगाव व येळी येथून बरबडा हाद्द चोरी व तस्करी वाढली आहे. या माफियांना ना कोणाचा धाक राहिला , ना कुणाची भिंती महसूल विभागाच्या वाळू माफिया रात्रीच्या दिवसाढवळ्या चालू आहे वाळूची चोरी करून खुलेआम वाहतूक करत आहेत. बरबडा हाद्दीतील ईळेगाव येथील व लोहा तालुक्यातील वाळू रात्रीला व मोठ्या प्रमाणात नायगाव तालुक्यातील बरबडा व बरबडा सर्कल अंतर्गत असलेल्या गावात नायगाव तसिलचा अनागोंदी कारभारामुळे वाळू व अवैध वाहतूक होत आहे. ती वाळू टिप्परमधून वाहतूक करुन विक्री केली जात आहे.गोदावरी पात्रातून दिवसाढवळ्या वाळू काढल्या जात आहे. चोरीने काढलेली वाळू नायगावच्या तहसीलदार यांनी चोरट्या मार्गाने वाळूचे उत्खनन करून अवैध वाहतूक करणाऱ्यांना रान मोकळे सोडले आहे. काय ? आशी चर्चा बरबडा व परिसरात सुरू आहे तहसीलदार डॉ . धमप्रिया गायकवाड यांनी याकडे लक्ष देऊन तत्काळ कारवाई करण्याची मागणी बरबडा व परिसरात गावकऱ्यांनी केली आहे.

# बिबट्यांचे बनावट पोस्ट; वन परिक्षेत्र अधिकाऱ्यांची सायबर पोलिसांकडे तक्रार

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

नगर तालुक्यात बिबट्यांची दहशत पसरली आहे. खारेकर्जुने, इसळक येथील दुर्दैवी घटनेनंतर सोमवारी (दि.१७ नोव्हेंबर) खारेकर्जुने शिवारातून दोन बिबट्यांना वन विभागाने ताब्यात घेतले.

मंगळवारी (दि.१८ नोव्हेंबर) सकाळपासून खातगाव मधील दोन बिबट्यांच्या फोटोची पोस्ट व्हायरल होताच परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले. पण ही पोस्ट बनावट असल्याचे वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. अशा बनावट पोस्टमुळे अहिल्यानगर शहर व तालुक्यात भीतीच्या वातावरणात भर




पडत असल्याने वन परिक्षेत्र अधिकाऱ्यांनी याबाबत सायबर पोलिसांकडे तक्रार केली आहे.

अहिल्यानगर तालुक्यात बिबट्यांनी धुमाकूळ घातल्याने तालुक्यात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अनेक पालक आपल्या मुलांना शाळेत पाठवत नाहीत, तर अनेकांनी शेतात जाणेही बंद केले आहे. तालुक्यातील जेऊर आणि परिसर, खडकी, सारोळा कासार, भोरवाडी, अकोळनेर, चिचोंडी पाटील, मांडवे, सांडवे, बुरूडगाव, भिंगार, राळेगण, रूईछत्तीसी या गावांसह अहिल्यानगर शहरातील काही भागात बिबट्या दिसल्याच्या पोस्ट सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. याप्रमाणेच प्रत्येक गावातील सोशल मीडिया ग्रुपवर पण बिबट्या दिसल्याचे मेसेज व्हायरल होत आहेत.

बिबट्यांबाबती माहिती सोशल मीडियावर येताच गावागावातून वन विभागला फोन येतात तसेच अर्ज प्राप्त होत आहेत.

> मंगळवारी सकाळी खातगावच्या फलकाजवळ दोन बिबटे दिसत असल्याचा फोटो व्हायरल झाला आहे. पण फलकाजवळ बिबटे नसून ते चित्ते आहेत. आणि चित्ते आपल्याकडे कोठेही आढळून येत नाहीत. ही पोस्ट जाणीवपूर्वक भीती पसरविण्याचा हेतुन 'एआय' तंत्रज्ञानाचा वापर करून बनविलेली आहे. जनतेने यावर विश्वास ठेवू नये. अशा खोट्या पोस्ट व्हायरल करणाऱ्या मूळ लोकांवर कारवाई करण्याची मागणी केली आहे.
> **– ए. बी. तेलोरे, वन परिक्षेत्र अधिकारी, अहिल्यानगर.**

वन विभागाच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन खात्री केल्यानंतर बिबट्याच्या वावराच्या कोणत्याही खुणा आढळून येत नाहीत किंवा त्या परिसरातील सीसीटीव्हीमध्ये देखील बिबट्या दिसत नाही. त्यामुळे वन विभाग सुध्दा संभ्रमात पडत आहे. अशा चुकीच्या पोस्ट जाणीवपूर्वक किंवा उत्सुकतेपोटी व्हायरल केल्या गेल्याने शहरासह तालुक्यात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अशा चुकीच्या पोस्ट व्हायरल करणाऱ्या लोकांचा शोध घेऊन त्यांच्यावर कारवाई करावी अशी मागणी वन परिक्षेत्र अधिकाऱ्यांनी अहिल्यानगर सायबर पोलिसांकडे केली आहे.

# संगणक अभावी, ऑनलाईन पावत्यासाठी सर्व सामान्य नागरीकांची हेळसांड

**नांदेड : (समर्थ गांवकरी)**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सिडको क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत असलेल्या लेखा विभागातील संगणक ईतर कार्यालयात असल्याने दैनंदिन नाव परिवर्तन सह ईतर विभागातील रक्कम भरण्यासाठी आलेल्या सर्व सामान्य नागरिकांना मात्र तासोनतास थांबवून प्रदिर्घ वेळेनंतर ऑनलाईन पावत्या देण्यात येत असुन प्रशासन मात्र जाणिव पुर्व दर्लक्ष करीत असल्याचे दिसून येत असुन तात्काळ ईतर कार्यालयात असलेला संगणक लेखा विभागात आणुन नागरीकांची होणारी गैरसोय टाळावी अशी मागणी जनतेतुन होत आहे. नावा मनपाच्या सिडको क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत मनपा प्रशासनाचा वतीने संबंधित विभागाने आयुक्त डॉ महेश कुमार डोईफोडे यांच्या आदेशानुसार क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत कोण कोणत्या विभागात संगणक आहेत किंवा नाही,नव्याने संगणक उपलब्ध लागणार का या बाबत सर्व्हे करून क्षेत्रीय कार्यालय सहाय्यक आयुक्त यांच्या कडून लेखी पत्र घेऊन नव्याने संगणक मागणी करण्यात आल्या नंतर सिडको क्षेत्रीय कार्यालय येथे एक संगणक लेखा विभागा साठी मंजूर करण्यात आले परंतु या विभागासाठी देण्यात आलेले संगणक निवडणूक संदर्भाने अन्य कार्यालयात गेल्यामुळे लेखा विभागाचे कर्मचारी मात्र नाव परिवर्तन सह ,जन्म मृत्यू, नवीन घर नंबर देणे, यासह अन्य कामांसाठी भरण्यात येणारे ऑनलाईन शुल्क साठी ईतर विभागातील संगणकावर बसून आपल्या वेळेनुसार संबंधित कर्मचारी पावत्या ऑनलाईन देत असल्याने नागरिकांनी मात्र तासोनतास वाट पाहवी लागत आहे.

# आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते नेहरू मार्केट येथे रस्ता कॉंक्रिटीकरण कामाचा शुभारंभ

- आमदार संग्राम जगताप यांनी तोफखाना परीसरात विविध विकास कामे मार्गी लावली-सुरज जाधव

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

आमदार संग्राम जगताप यांनी तोफखाना परिसरातील अनेक विकास कामे स्थानिक विकास निधीतून मार्गी लावलेली आहेत. तोफखाना परिसरात अनेक रस्ते कॉंक्रिटीकरण केलेले आहेत.

या परिसरातील अनेक समस्या सोडवण्यासाठी आमदार संग्राम जगताप सदैव तत्पर असतात. नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी वेळोवेळी आमदार



संग्राम जगताप धाऊन येतात. आमदार संग्राम जगताप यांनी तोफखाना परीसरात विविध विकास कामे मार्गी लावली आहेत. असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्ते सुरज जाधव यांनी केले आहे.

चितळे रोड येथील नेहरू मार्केट ते चिलका टेलर रस्ता कॉंक्रीटीकरण कामाचा शुभारंभ आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते नारळ वाढवून करण्यात आला.याप्रसंगी सामाजिक कार्यकर्ते सुरज जाधव,माजी नगरसेवक दीपक सुळ,धनंजय जाधव,संजय ढोणे,महेंद्र बीज्जा, दत्तात्रय मुदगल,प्रताप परदेशी, सारंग पंधाडे,अभिजीत चिप्पा, सागर मुर्तडकर,गणेश झिंजे, ऋषिकेश तरोटे,बाळू कांबळे, दत्तात्रय कोंडके,संपत गुगळे, सुशांत जाधव,बालाजी गौरी,बंटी परदेशी,चेतन आरकल, यशवंत कांबळे,सचिन पळशीकर,अर्जुन जज्जर,वीरू शेकटकर,दत्तात्रय कुलकर्णी, गजेंद्र सैंदर,सचिन दगडे,अजय सासवडकर, श्वेताताई पंधाडे, सुनंदा ताठे, पारूबाई लांडे, सुरेखा शेकटकर, अनिता कांबळे,दुर्गा कांबळे आदी उपस्थित होते.

# 'स्वारातीम' विद्यापीठामध्ये इंदिरा गांधी यांची जयंती साजरी

**नांदेड : (समर्थ गांवकरी)**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीतील स्वागत कक्षामध्ये आज दि.१९ नोव्हेंबर, २०२५ रोजी माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांची जयंती साजरी करण्यात आली. विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. मनोहर चासकर यांनी इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. आणि उपस्थितांना राष्ट्रीय एकात्मा दिवसाची शपथ दिली. यावेळी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील, डॉ. चंद्रकांत



बाविस्कर, वित्त व लेखाधिकारी डॉ.पराग भालचंद्र, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ.शैलेश वाढेर, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ.मारुती गायकवाड, आयक्यूएसी सेलचे संचालक डॉ. सुरेंद्रनाथ रेड्डी, जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम, सहा.कुलसचिव रामदास पेद्देवाड यांच्यासह विद्यापीठातील प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थी यांनी इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले. आणि राष्ट्रीय एकात्मा दिवसाची शपथ घेतली.

# मतदान जनजागृतीला देगलूरांची उत्स्फूर्त साथ

**देगलूर : (समर्थ गांवकरी)**

देगलूर नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर शहरात आयोजित करण्यात आलेल्या मतदान जनजागृती स्वाक्षरी मोहिमेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. "मतदान हा हक्क आणि जबाबदारी" ही जाणीव मनामनांत दृढ व्हावी, या उद्देशाने राबविण्यात आलेली ही मोहीम सकाळी दहा वाजता नवीन बसस्थानक, नगर परिषद कार्यालय आणि लोहिया मैदान येथे मोठ्या उत्साहात पार पडली. निवडणूक निर्णय अधिकारी अनुप पाटील, सहा. निवडणूक निर्णय अधिकारी तथा नगर परिषद मुख्याधिकारी निलम कांबळे आणि अतिरिक्त सहा. निवडणूक निर्णय अधिकारी भरत सूर्यवंशी यांच्या उपस्थितीत मोहिमेचे उद्घाटन झाले. महाविद्यालयीन विद्यार्थी, नवमतदार, महिला, ज्येष्ठ नागरिक, तसेच अपंग व्यक्तींच्या मोठ्या उपस्थितीमुळे जनजागृतीला ऊर्जा लाभली.

# शिववरद प्रतिष्ठानच्यावतीने नालेगाव येथील युवकांचा सत्कार

- युवकांचे दिशादर्शक कार्य -किशोर डागवाले

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

नालेगाव भागातील युवक गणेशोत्सव, छत्रपती शिवाजी महाराज जयंती, दहिहंडी उत्सव या कार्यक्रमातून सामाजिक कार्यात सक्रिय सहभाग घेत असतात.

भूमिपुत्र प्रतिष्ठानच्या माध्यमातून अनेक सामाजिक उपक्रम राबवत असतात.आजचे युवक हे देश व समाजाला दिशा देण्याचे कार्य करीत आहेत. असे प्रतिनिपादन माजी स्थायी समिती सभापती किशोर डागवाले यांनी केले आहे.

पटवर्धन चौक रंगारगल्ली



येथे शिववरद प्रतिष्ठानच्या वतीने नालेगाव येथील सामाजिक कार्यकर्ते करण लांडे,अँड.गौरव दांगट,संदीप ठाणगे,मयूर मैड,अजय भोसले यांचा वाढदिवसानिमित्त सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी माजी स्थायी समिती सभापती किशोर डागवाले,माजी नगरसेवक दत्तात्रय मुदगल, अजय चितळे, भाजपाचे उपाध्यक्ष बाळासाहेब भुजबळ, अँड.गजेंद्र दांगट, अँड. अनिल धाडगे, डॉ.रणजीत सत्रे,सुहास पाथरकर,कॅप्टन सुधीर पुंड, विनोद पुंड,अनिल इवळे, शिववरद प्रतिष्ठानचे अध्यक्ष सागर गोरे,कार्याध्यक्ष अँड.सुनील सूर्यवंशी,उपाध्यक्ष नितीन डागवाले,खजिनदार सचिन भिंगारकर,अँड.मंदार पळसकर,सचिन पाथरकर, नितीन भाऊसाहेब डागवाले, रोहन डागवाले, आशुतोष वाघमारे, ओंकार घोलप,कुमार सुसरे,अनिल शिंदे,ज्येष्ठ नागरिक संघाचे बाबासाहेब वैद्य, इंजिनिअर इलियास शेख,रऊफ खान,सुभाष दारवेकर,शहाजी काका डफळ,अरुण दिकोंडा, विलास दिकोंडा,हाजी हुसेन सय्यद,धनंजय शिरसाठे, बाळासाहेब डफळ,किरण ताकपिरे,ज्ञानदेव भांगे,योगेश गणगले,तेजस डागवाले,मंथन डागवाले, ऋषिकेश डागवाले, संदीप नामदास,किरण कुलकर्णी, आदेश डागवाले आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.

# छत्रपती शिवाजी प्राथमिक विद्यालयाला डिजिटल बोर्ड भेट



**राहुरी : (समर्थ गांवकरी)**

राहुरी फॅक्टरी येथील साई आदर्श मल्टीस्टेट संस्थेने सामाजिक उत्तरदायित्वाच्या भावनेतून एक प्रशंसनीय उपक्रम राबवत छत्रपती शिवाजी प्राथमिक विद्यालयास अत्याधुनिक चार डिजिटल बोर्ड भेट दिले.आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरातून विद्यार्थ्यांचे ज्ञान अधिक परिणामकारक पद्धतीने वाढावे, शिक्षण अधिक आकर्षक आणि समजण्यास सोपे व्हावे, यासाठी हा उपक्रम राबवण्यात आला आहे.

यावेळी बोलताना साई आदर्श मल्टिस्टेटचे चेअरमन शिवाजीराव कपाळे म्हणाले आजच्या डिजिटल युगात मुलांना पारंपरिक शिक्षणाबरोबरच स्मार्ट शिक्षणाची साथ मिळणे अत्यंत आवश्यक झाले आहे.याच गरजेला प्रतिसाद देत साई आदर्श मल्टीस्टेटने ही महत्त्वाची सुविधा उपलब्ध केली असून डिजिटल बोर्डच्या माध्यमातून शिक्षकांना विषयांचे सादरीकरण सुलभ होणार आहे.

यावेळी श्री.शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष ज्ञानेश्वर कोळसे, डॉ.तनपुरे कारखान्याचे संचालक अशोक उऱ्हे, विष्णुपंत गीते, किशोर थोरात, शांती चौक मित्र मंडळाचे अध्यक्ष दीपक त्रिभुवन, दत्तात्रय गोपाळे, मॅनेजर सचिन खडके, योगेश आंबेडकर सर, सुजित गवळी, मुख्याध्यापीका चोखर मॅडम आदींसह शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी उपस्थित होते.

या प्रसंगी ज्ञानदेव कोळसे म्हणाले साई आदर्श नेहमीच सामाजिक कामात अग्रेसर राहिली आहे. अर्थ कारना बरोबर शिवाजीराव कपाळे यांचे सामाजिक काम वाखाण्याजोगे व इतरांनी त्यांचा आदर्श घेण्या जोगे आहे.

या प्रसंगी शाळेच्या मुख्याध्यापिका चोखर मॅडम यांनी साई आदर्श मल्टीस्टेटचे आभार व्यक्त करत संस्था सातत्याने शैक्षणिक क्षेत्रात योगदान देत असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन देशमुख सर यांनी केले.



नवीन नांदेड - भारतीय जनता पार्टीचे राज्यसभा खासदार डॉ.अजित गोपछडे यांच्या वाढदिवसा निमित्त महात्मा गांधी निवासी अपंग शाळा सिडको ज्ञानगंगा येथे विद्यार्थ्यांना शालेय साहित्य आणि फळ वाटप आयोजक भाजपा ओबीसी जिल्हा महानगर अध्यक्ष विनोद कांचनगिरे व उपाध्यक्ष संतोष कांचनगिरे यांच्या वतीने मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले.

## थोडक्यात बातम्या...



### पुढील दहा वर्षे भारताच्या विमा उद्योगासाठी महत्त्वाची

पुणे (स. गांवकरी) : नॅशनल इन्शुरन्स अकॅडमी (NIA), पुणे यांनी '21वे इन्शुरन्स समिट 2025' यशस्वीरित्या आयोजित केले. या समिटमध्ये वरिष्ठ उद्योग नेते, नियामक संस्था, रीइन्शुरर्स, अॅक्चुअरीज आणि इन्शुरटेक तज्ज्ञ यांनी भारताच्या विमा उद्योगातील प्रॉडक्ट इनोव्हेशनच्या भविष्यावर सखोल चर्चा केली. "प्रॉडक्ट इनोव्हेशन : रिइमॅजिनिंग & रिअलाईनिंग" या थीमवर आधारित हा कार्यक्रम विकसित भारत 2047 चे स्वप्न आणि IRDAI चे 'Insurance for All by 2047' हे ध्येय अधिक गतीने साध्य करण्यावर केंद्रित होता. कार्यक्रमाची सुरुवात NIA चे संचालक श्री. बी.सी. पटनाईक यांच्या स्वागतपर भाषणाने झाली. त्यानंतर श्री. रत्नाकर पटनाईक, व्यवस्थापकीय संचालक, LIC ऑफ इंडिया यांनी उद्घाटनपर भाषण केले. श्री. संजय केडिया, CEO, Marsh McLennan India आणि अध्यक्ष व CEO, Marsh India Insurance Brokers Pvt. Ltd., यांनी विशेष संबोधन केले तसेच सुश्री. गिरीजा सुब्रमण्यन, CMD, द न्यू इंडिया अश्युरन्स कंपनी लिमिटेड यांनी कीनोट भाषण दिले. मुख्य अतिथी श्री. सत्यजित त्रिपाठी (मेंबर - वितरण, IRDAI) यांनी भविष्यासाठी आवश्यक विमा उपाययोजनांवर व नियामक संस्थांच्या प्राधान्यक्रमांवर प्रकाश टाकला.



### वेद भारतीय संस्कृतीचा आत्मा आहे : स्वामी श्री गोविंददेव गिरीजी महाराज

पुणे (स. गांवकरी) : भारतीय संस्कृति ही वेदमूलक आहे. यामध्ये जे ज्ञान आहे त्या ज्ञानाच्या उपासनेतूनच एक दिवस भारत माता विश्वगुरू होईल. खरंतर वेद हा भारतीय संस्कृतीचा आत्मा आहे आणि विश्व हिंदू परिषदेचे आंतरराष्ट्रीय महामंत्री राहिलेले अशोक सिंघल हे ख-या अर्थाने वेदोपासक होते, असे गौरवोद्गार अयोध्या श्री राम मंदिर ट्रस्टचे कोषाध्यक्ष स्वामी गोविंददेव गिरी महाराज यांनी काढले. विश्व हिन्दू परिषदेचे संस्थापक सदस्य तथा श्री रामजन्म भूमि आंदोलनाचे अग्रणी अशोक सिंघल यांच्या पुण्यतिथी निमित्ताने भारतात्मा अशोक सिंघल वेद पुरस्कार दर वर्षी प्रदान केले जातात. याच श्रृंखलेत २०२५ चे पुरस्कार सोमवार १७ नोव्हेंबर २०२५ रोजी बीएमसीसी रोडवरील दादासाहेब दरोडे सभागृहात वितरित करण्यात आले. उत्कृष्ट वेद विद्यार्थी श्रेणीतील पुरस्कार हैदराबाद येथील श्री नोरी केदारेश्वर शर्मा, चेन्नईचे श्री अनंत कृष्ण भट्ट यांना आदर्श वैदिक शिक्षक पुरस्कार आणि सर्वोत्कृष्ट वैदिक संस्था पुरस्कार आंध्र प्रदेशातील राजमहेंद्रवरम येथील श्री दत्तात्रेय वेद विद्यालयाला यांना तीन लाख, पाच लाख आणि सात लाख रुपये, प्रमाणपत्र आणि स्मृतिचिन्ह देऊन स्वामी गोविंददेव गिरी महाराज आणि आचार्य श्री प्रद्युम्न महाराज यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. त्यावेळी व्यासपीठावर सिंघल फाऊंडेशन मार्गदर्शक रवींद्र मुळे, सिंघल फाऊंडेशन चे मुख्य विश्वस्त संजय सिंघल आणि सलिल सिंघल उपस्थित होते.

### हचिंग्ज आणि जे.एन. पेटिट स्कूल दोन विभागाच्या उपांत्य फेरीत



पुणे (स. गांवकरी) : हचिंग्ज एच.एस. (१२ आणि १४ वर्षांखालील) व जे.एन. पेटिट टेक्निकल स्कूलने (१४ आणि १६ वर्षांखालील) लोयोला फुटबॉल कप २०२५ स्पर्धेमध्ये प्रत्येकी दोन विभागांमध्ये उपांत्य फेरी गाठली. पाषाण येथील लोयोला एच.एस. मैदानावर सुरू असलेल्या स्पर्धेत विद्या भवन (१२ वर्षांखालील) आणि लोयोला एच.एस. (१६ वर्षांखालील) संघांनीही अंतिम चार संघांत स्थान मिळवले आहे. १२ वर्षांखालील गटात, विद्या भवनने सेंट पॅट्रिक्सवर २-१ असा विजय मिळवला,अनिकेत मोरेने (७ व २२वे व मिनिट) दोन गोल करत विजयात मोलाचा वाटा उचलला. सेंट पॅट्रिक्सचा एकमेव गोल कृष्ण पिल्लेने (१३ मिनिटे) केला. त्याच वयोगटात, हचिंग्ज एच.एस.ने टायब्रेकरमध्ये द कल्याणी स्कूलचा ३-२ असा पराभव केला. निर्धारित वेळेत १-१ अशी बरोबरी झाली. युवान मेहराने (१४ मिनिटे) कल्याणी स्कूलचे खाते उघडले. मात्र, विवान शेनॉय (२८ मिनिटे) हचिंग्ज एच.एस. संघाला बरोबरी गाठून दिली. १-१ अशा बरोबरीनंतर टायब्रेकरचा अवलंब करून सामन्याचा निकाल लावण्यात आला. त्यात, हचिंग्ज एच.एस.कडून अनय चव्हाण आणि आकाश खैरेने गोल करून संघाला जिंकून दिले. कल्याणी स्कूलकडून विवान प्रसाद यालाच गोल करता आला. १४ वर्षांखालील गटात हचिंग्ज एच.एस. ने चुरशीच्या लढतीत इन्फंट जीससवर ३-२ अशी मात केली. पार्थ पाटीलने (१२ व्या, ४१ व्या मिनिटाला) दोन आणि शौर्य परदेशीने (२० व्या मिनिटाला) एक गोल करत विजयात मोलाचे योगदान दिले. स्टीफन कुमार (१० व्या मिनिटाला) आणि चैतन्य पांगुलमुळे (१३ व्या मिनिटाला) इन्फंट जीससने सुरुवातीला आघाडी घेतली होती. मात्र, त्यांना आघाडी राखता आली नाही.

# पुणे जिल्ह्यात बिबट्यांसाठी दोन बचाव केंद्रे सुरू करण्याचे निर्देश : मुख्यमंत्री

**खोडद : (समर्थ गांवकरी)**

राज्यात बिबट्याकडून मानवावर होणारे हल्ल्यांची समस्या ही राज्य आपत्ती घोषित करण्यासंबंधीचा प्रस्ताव पुढील मंत्रिमंडळ बैठकीसमोर ठेवण्यात यावेत. तसेच बिबट्यांना शेड्यल एक मधून काढून शेड्यल दोन मध्ये समाविष्ट करण्यासंदर्भात प्रस्ताव सादर करण्यात यावे. मानवावर हल्ले करणाऱ्या बिबट्यांना आळा घालण्यासाठी तातडीने आवश्यक त्या ठिकाणी पिंजरे पुरविण्यात यावेत. येत्या दोन ते तीन महिन्यात पुणे जिल्ह्यात बिबट्यांसाठी तातडीने दोन बचाव केंद्रे (रेस्क्यू सेंटर) सुरू करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.



राज्यातील बिबट्यांच्या प्रश्नांसंदर्भात मंत्रालयात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. त्यावेळी त्यांनी हे निर्देश दिले. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, वनमंत्री गणेश नाईक, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, माजी मंत्री दिलीप वळसे पाटील, मुख्य सचिव राजेश कुमार, वन विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, मदत व पुनर्वसन विभागाच्या प्रधान सचिव विनिता वैद सिंगल, राज्याचे प्रधान मुख्य वन संरक्षक (वनबल प्रमुख) एम श्रीनिवास राव, प्रधान मुख्य वन संरक्षक (वन्य जीव) श्रीनिवास रेड्डी, पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी ,जुन्नरचे आमदार शरददादा सोनवणे आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्यात बिबट्यांचे हल्ले वाढले आहेत. त्यांना आळा घालण्यासाठी कालबद्ध पद्धतीने तातडीचे आणि दीर्घकालीन अशा दोन प्रकारे उपाययोजना करण्यात याव्यात.

तातडीच्या उपायांमध्ये गावे व शहरांजवळील बिबट्यांना शोधून पकडण्यात यावेत. यासाठी ड्रोनची मदत घ्यावी. पिंजरे, वाहने, मनुष्यबळ आदी बिबटे पकडण्यासाठी आवश्यक साहित्यासाठी जिल्हा नियोजन समितीतून निधी उपलब्ध करून द्यावेत. तसेच दीर्घकालीन उपाययोजनेत बिबट्यांची नसबंदी करण्यात यावी. तसेच पकडलेल्या नरभक्षक बिबट्यांना ठेवण्यासाठी पुणे जिल्ह्यात दोन रेस्क्यू सेंटर उभारण्यासाठी तातडीने जागा शोधून आराखडे तयार करावेत. तसेच गोरेवाडासह इतर ठिकाणी सध्या असलेल्या रेस्क्यू सेंटरची क्षमता वाढविण्यात यावी.बिबट्यांचा समावेश शेड्यल एक मध्ये आहे.

त्यामुळे नरभक्षक बिबट्यांना पकडणे, त्यांना मारणे यावर मर्यादा येतात. त्यामुळे बिबट्यांना शेड्यल एकमधून काढण्यासंबंधी केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठवावा. बिबट्यांच्या नसबंदीची परवानगी केंद्र शासनाकडून मिळाली आहे. त्यामुळे नरभक्षक बिबट्यांना शोधून नसबंदी करण्यात यावे, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

## शेतजमिनीच्या बांधाच्या वादातून दोन भावावर हल्ला

**कंधार : (समर्थ गांवकरी)**

शेतीच्या धुऱ्याच्या वादातून वादातून कंधार तालुक्यातील मसलगा गावात शेतकरी कुटुंबाला बेदम मारहाण करण्यात आली. याप्रकरणी कंधार पोलिस ठाण्यात १२ जणांविरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. याप्रकरणी सुरेश थोराजी वडजे, व्यंकटराव वडजे रा. मसलगा यांनी पोलिसांत तक्रार दिली. त्यांच्या तक्रारीनुसार, शेतीच्या धुऱ्याच्या वादातून कैलास सूर्यकांत वडजे,नितीन श्याम वडजे,भागवत यशवंत वडजे,सूर्यकांत यशवंत वडजे,भाऊसाब सूर्यकांत वडजे,ज्ञानेश्वर भागवत वडजे,माधव भागवत वडजे,सुनील श्याम वडजे,मनोहर मारुती वडजे,माधव उद्धव वडजे,सुधाकर मोतीराम वडजे यांनी दि. १५ नोव्हेंबर रोजी संध्याकाळी ५.३० च्या सुमारास शेतशिवारात गस्त घालून सुरेश थोराजी वडजे आणि व्यंकटराव थोराजी वडजे यांना तुमचा संतोष देशमुख केल्याशिवाय सोडणार नाही म्हणून सदरील आरोपीने कुराड,चाकू,लोखंडी रॉड आणि लाठी काठ्यांनी बेदम मारहाण केल्याने गंभीर जखमी झाले. ११ जनावर सुरेश वडजे,व्यकटराव थोराजी वडजे यांनी १६ नोव्हेंबर २०२५ रोजी ७.५७ वाजता कंधार पो.स्टे.येथे गुन्हा नं. ३७७/ २५ दाखल केला आहे.

## पडघा पंचशीलनगर रस्त्यावर प्लास्टिक कचऱ्याचा खच

- दुर्गंधी व रोगराईचा धोका वाढला
- ग्रामपंचायतीकडून विल्हेवाट व्यवस्थेकडे

**भिवंडी : (समर्थ गांवकरी)**

भिवंडी तालुक्यातील पडघा ग्रामपंचायत हद्दीतील पंचशील नगर रस्त्याच्या कडेला मोठ्या प्रमाणावर प्लास्टिक कचऱ्याचा खच साचल्याने नागरिकांचे आरोग्य गंभीर धोक्यात आले आहे. प्लास्टिकचे दुष्परिणाम सर्वांना माहिती असतानाही ग्रामीण भागात त्याचा वापर होत असल्याने पर्यावरणाच्या ऱ्हासासोबतच पशुपक्ष्यांना देखील बाधा होत आहे.



रस्त्याच्या दोन्ही बाजूंना प्लास्टिक पिशव्या, चहाचे रिकामे कप, खराब पाले- भाज्या, प्लास्टिक बॉटल, कॅरीबॅगसह सर्व प्रकारचा घनकचरा साचलेला आहे. त्यामुळे परिसरात प्रचंड दुर्गंधी पसरली असून माशा-कीटकांचा उपद्रव वाढला आहे. या मार्गावरून जाणाऱ्या नागरिकांना, शाळकरी विद्यार्थ्यांना आणि प्रवाशांना दररोज नाहक त्रास सहन करावा लागत आहे. राज्यात ५० मायकॉनपेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिक पिशव्यांवर बंदी असतानाही ग्रामीण भागात या प्लास्टिक पिशव्या मोठ्या प्रमाणावर वापरल्या जात आहेत. दुकानादारांकडून पिशव्या दिल्या जात असून ग्राहकही त्या सहज घेतात आणि वापरून झाल्यावर रस्त्याच्या कडेला टाकतात. परिणामी, पंचशीलनगर परिसरात कचऱ्याचे साम्राज्य निर्माण झाले आहे. या साचलेल्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्याबाबत पडघा ग्रामपंचायतीकडून कोणतीही ठोस कारवाई न केल्याने स्थानिकांमध्ये नाराजी व्यक्त केली जात आहे. "पडघा ग्रामपंचायत कचरा कधी उचलणार?" असा प्रश्न नागरिक उपस्थित करत असून तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली जात आहे.

## अमनोरा स्कूलमध्ये अमनोरा मॉडेल युनायटेड नेशन्सचे प्रभावी 6वे संस्करण

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

अमनोरा स्कूलने अमनोरा मॉडेल युनायटेड नेशन्स (AMUN) चे 6वे संस्करण यशस्वीपणे आयोजित केले. पुण्यातील विविध शाळांमधील विद्यार्थ्यांना एकत्र आणत ही परिषद जागतिक विषयांवरील सखोल चर्चा आणि चिंतनासाठी उपयुक्त ठरली. या वर्षी 20 शाळांमधील 132 प्रतिनिधींनी सहभाग नोंदवला, ज्यामुळे AMUN ची पुण्यातील शैक्षणिक क्षेत्रातील वाढती प्रतिष्ठा अधोरेखित झाली. सात समित्यांचे अनुकरण करण्यात आले, ज्यात UNHRC, UNEP,



UNCSW, DISEC, AIPPM, IMF आणि IPC यांचा समावेश होता. प्रतिनिधींनी टॅरिफ नियम, प्राणी संगोपन, मध्य पूर्वेतील आण्विक प्रसार अशा विषयांवर विचारमंथन केले. आंतरराष्ट्रीय प्रेस टीमने सर्व समित्यांचे स्वतंत्र कव्हरेज करून कार्यक्रमाला अधिक व्यापकता दिली. परिषद प्रेरणादायी उद्घाटन सत्राने सुरू झाली आणि उत्साही समारोप सत्राने पूर्ण झाली. या प्रक्रियेत विद्यार्थ्यांनी सार्वजनिक भाषण, राजनैतिक संवाद, विचारशीलता आणि नेतृत्व अशा कौशल्यांचा अधिक विकास केला. AMUN च्या यशाबद्दल बोलताना अमनोरा स्कूलच्या संचालक-प्राचार्या मीरा नायर म्हणाल्या, "विद्यार्थ्यांनी दाखवलेली परिपक्वता, स्पष्टता आणि आत्मविश्वास उल्लेखनीय होता. AMUN ही फक्त परिषद नाही, तर तरुणांनी ऐकणे, सखोल विचार करणे आणि उद्देशपूर्ण नेतृत्व करणे शिकण्याची एक प्रभावी संधी आहे. दोन दिवस त्यांनी दाखवलेल्या उत्साहाचा आणि शिस्तीचा आम्हाला अभिमान आहे." या यशस्वी आयोजनानंतर अमनोरा स्कूलने पुढील AMUN 7.0 साठी तयारी सुरू केली आहे.

## जिल्हा परिषद, ठाणे येथे नशामुक्त भारत अभियानाची शपथ

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

भारत सरकारच्या सामाजिक न्याय आणि अधिकारिता मंत्रालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या नशामुक्त भारत अभियान (NMBA) च्या ५ व्या वर्धापन दिनानिमित्त देशभरात विविध उपक्रम आयोजित करण्यात येत आहेत. त्यानुसार जिल्हा परिषद, ठाणे मुख्यालयात आज, दि. १८ नोव्हेंबर, २०२५ रोजी अधिकारी–कर्मचाऱ्यांकडून "नशामुक्ती शपथ" घेतली गेली. जिल्हा परिषदेतील शपथ विधी कार्यक्रमास उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) अविनाश फडतरे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) बाळासाहेब राक्षे, समाज कल्याण विभाग प्रमुख तसेच कार्यक्रमाचे जिल्हा नोडल अधिकारी उज्वला सपकाळे, जिल्हा कार्यक्रम अधिकारी महिला व बाल कल्याण विभाग संजय बागुल, कार्यकारी अभियंता (समग्र शिक्षा) युवराज कदम तसेच जिल्हा परिषदेतील विविध विभागांचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

# वाळू तस्करास एमपीडीए अंतर्गत स्थानबद्ध करुन हारसुल कारागृह येथे दाखल



### पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार यांचा अनोखा विक्रम

**नांदेड : (समर्थ गांवकरी)**

नांदेड जिल्ह्यात सार्वजनिक सुव्यवस्था अबाधित राखणे आणि समाजातील गुन्हेगारीचे समुळ उच्चाटन करण्यासाठी नांदेड पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार , यांनी कठोर पावले उचलली आहेत. वाळू तस्करी करणाऱ्या गुन्हेगारास एमपीडीए अंतर्गत राहुल कर्डिले ,जिल्हा दंडाधिकारी, नांदेड यांनी,अबिनाश कुमार पोलीस अधीक्षक, नांदेड यांच्या शिफारशी नुसार स्थानबद्ध आदेश जारी केले आहेत. जिल्ह्यातील अवैध वाळू तस्करीस आळा घालण्यासाठी पोलीस प्रशासनाकडून सतत विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमे दरम्यान अवैध वाळू उपसा व विक्री करणाऱ्या गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तीविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येत आहे. स्थानबद्ध इसम स्वप्नील दिलीप चौदंते हा दीर्घकाळा पासून गोदावरी नदी पात्रातून वाळूची अवैधरित्या तस्करी करून चोरटी विक्री करत होता, त्याच्या या बेकायदेशीर कृत्यांमुळे नदीपात्राचे अपरिवर्तनीय नुकसान, पर्यावरणीय असंतुलन तसेच परिसरातील सार्वजनिक सुव्यवस्थेवर गंभीर परिणाम होत आहेत. सदर व्यक्तीविरुद्ध यापूर्वीही गुन्हे दाखल करण्यात आलेले असून, तरीदेखील त्याने अवैध धंदे थांबविले नाही. त्याच्या या वारंवार करत असलेल्या गुन्हेगारी कृत्यांमुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. सदर व्यक्तीच्या अवैध कारवाया सार्वजनिक सुव्यवस्थेस विपरीत परिणाम करत असल्याने, सार्वजनिक सुव्यवस्था व शांतता अबाधित ठेवण्याच्या दृष्टीकोणातून सदर वाळू तस्कर स्वप्नील दिलीप चौदंते यास एमपीडीए अधिनियमा प्रमाणे स्थानबध्द करणे बाबतचा प्रस्ताव ओमकांत चिंचोलकर,पोलीस निरीक्षक, नांदेड ग्रामीण यांनी पोलीस अधीक्षक, नांदेड यांचेकडे सादर केला होता. प्रस्तावांमध्ये काही उणीवा राहणार नाहीत या करीता उदय खंडेराय, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, नांदेड यांनी महत्वपूर्ण कामकाज पाहीले आहे. अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक, नांदेड यांनी सदर एमपीडीए प्रस्तावामधील उक्त गुन्हेगारास एक वर्षाकरीता स्थानबध्द करण्याबाबतची शिफारस मा. जिल्हादंडाधिकारी नांदेड यांचेकडे केली होती.त्यावरुन राहुल कर्डिले , जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, नांदेड पांनी सदर प्रस्तावातील नमुद गुन्हेगारास एक वर्षाकरीता हासूल मध्यवर्ती कारागृह, छत्रपती संभाजीनगर येथे एमपीडीए कायद्या अंतर्गत स्थानबध्द करण्या बाबतचे दिनांक १८ नोव्हेंबर रोजी आदेश पारीत केले आहेत. गुन्हेगारांस ताब्यात घेवून हार्सेल कारागृह छत्रपती संभाजीनगर येथे बंद करण्यात आले आहे.

# निसारभाई चिंचोलीकर लोकशक्ती महाराष्ट्र गौरव पुरस्काराने सन्मानित

**खोडद : (समर्थ गांवकरी)**

लोकशक्ती न्यूज नेटवर्कचा प्रथम वर्धापन दिन व महाराष्ट्र गौरव पुरस्कार वितरण सोहळा अहिल्यानगर येथील हॉटेल यश ग्रँड येथे संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी नाशिक येथील ज्येष्ठ साहित्यिक ऐश्वर्य पाटेकर, पाठ्यपुस्तकातील कवी कैलास दौंड, दत्ताराम राठोड अप्पर पोलीस अधीक्षक नागपूर, ज्येष्ठ साहित्यिक अनंत कराड शिरूर कासार, प्रल्हाद गीते सहाय्यक पोलीस निरीक्षक नगर तालुका, अन्सार शेख संस्थापक अध्यक्ष द युवा ग्रामीण पत्रकार




संघ महाराष्ट्र राज्य, चित्रा दीक्षित सिने अभिनेत्री मुंबई, डॉ आम्रपाली मोहिते संस्थापक अध्यक्ष सावली फाउंडेशन पुणे, वैभव कुऱ्हाडे विनोद सम्राट (गंठण कुमार) मस्ती फेम, डॉ भाऊसाहेब देवकाते सहाय्यक प्राध्यापक डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ संभाजीनगर, लोकशक्तीचे मुख्य संपादक विजय लेंडाळ कार्यकारी संपादक इम्रान शेख द युवा ग्रामीण पत्रकार संघ महाराष्ट्र राज्य सचिव बाळासाहेब कोठुळे, द युवा ग्रामीण पत्रकार संघ पुणे जिल्हा अध्यक्ष शकील मनियार, पत्रकार वजीर शेख ,पत्रकार जावेद शेख यांच्यासह अनेक मान्यवर या कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

या राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्यात ताशा वादन क्षेत्रात अद्वितीय कामगिरी, प्रचंड लोकप्रियता आणि अनेक वर्षांची सांस्कृतिक सेवा याबद्दल चिंचोली काशीद ता.जुन्नर येथील निसारभाई पटेल यांना ताशा सम्राट पुरस्काराने गौरविण्यात आले.

निसारभाई पटेल एकमेव जुन्नर तालुक्यातील ताशा परंपरेला दिशा देणारे आहेत. ताशा पथकांचे प्रशिक्षण, युवकांना कलेची गोडी निर्माण करणारे आहेत. सार्वजनिक उत्सव आणि सांस्कृतिक सोहळ्यांमध्ये त्यांच्या ताशापथकाचा नावलौकिक त्यांची ओळख 'ताशा सम्राट' म्हणून राज्यभर पसरली आहे. त्यांच्या ताशा वादनातील बारकावे आणि भव्य आविष्कार म्हणजे महोत्सवात उर्जा असते.



ठाणे महानगरपालिकेच्या विद्यमाने महापालिकेच्या कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात माजी पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांच्या जयंतीनिमित्त त्यांचे प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. तसेच राष्ट्रीय एकात्मता दिनानिमित्त शपथ ग्रहण करण्यात आली. यावेळी अतिरिक्त आयुक्त 2 प्रशांत रोडे, उपायुक्त उमेश बिरारी, कार्यालयीन उपअधीक्षक सुनील परदेशी यांच्यासह महापालिकेचे कर्मचारी उपस्थित होते. (फोटो- संतोष पडवळ)

## थोडक्यात बातम्या...

### देगलूर आगार भंगार गाड्या; खिळखिळ खिडकीतून करावा लागतो प्रवास



**देगलूर (स. गांवकरी) :** काही दिवसापूर्वी येथील रा प आगार प्रमुखांनी मुलाखत देऊन आम्ही विक्रमी उत्पन्न मिळवले असे सांगितले, परंतु या मध्ये सर्वात जास्त श्रेय प्रवासी नागरिकांना जाते, कारण प्रवाशी मग तो फुल्ल तिकीट वाला, महिला अथवा जेष्ठ असो, प्रवाशी भाड्याची रकमेची परिपूर्ती महाराष्ट्र शासन करते,जर एवढे उत्पन्न मिळुनही एस.टी. महामंडळ प्रवासीची गैरसोय का करते, चांगल्या मूलभूत सोईसुविधा का देत नाही? याचे ताजे उदाहरण म्हणजे दिनांक १५ नोव्हेंबर रोजी सेवानिवृत्त जनसंपर्क अधिकारी गंगाधर गुंगेवार यांना आलेला कटू अनुभव! ते स्वतः पत्नी सह देगलूर च्या जुन्या बस स्थानक येथे पहाटे ५- १० मिनिटाला आले, ४- ४५ वाजता निघणारी पुणे बस ५-१५ मिनिटांनी उशिरा निघाली, नांदेडला जाणारी ५- ३० ची बस सकाळी ६-१० पर्यंत आली नाही नाईलाजाने त्यांना ६ ची एम. एच. २० बी. एल. १९९३ क्रमांकाची बस ६-१० ला सुटली. रा. प. महामंडळ च्या भंगार झालेला या बसमधून भिजत प्रवास करत गाड्यांच्या खिळ, खिळया झालेल्या खिडकीतून आलेल्या गार हवेने थंडीत गारटून जाऊन नाईलाजाने तुटक्या बाकावर बसून प्रवास करावा लागतो, हे दुर्दैव..! आज सकाळी नांदेडला पुण्याला जाणाऱ्या प्रवासी नागरिकांचे हाल झाले त्याची देगलूर आगार प्रमुख दखल घेतील काय? भविष्यात तरी गाड्या वेळेवर सोडण्याची काळजी घेतील अशी अपेक्षा प्रवासी करीत आहेत.

### राजमाता जिजाऊ सभागृह येथे जुन्नर नगरपरिषद प्रशिक्षण संपन्न

**शिवनेरी (स. गांवकरी) :** जुन्नर नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ दि.१९ वार बुधवार स. १० : ३० वा. पासुन पंचायत समिती राजमाता जिजाऊ सभागृह येथे नेमलेल्या मतदान कर्मचाऱ्यांचे प्रथम प्रशिक्षण पार पडले . सदर प्रशिक्षणासाठी एकूण १६६ कर्मचारी उपस्थित होते . सदर कर्मचारी यांना पी पी टी मार्फत आणि प्रशिक्षण ईव्हीएम मार्फत प्रशिक्षण देण्यात आले अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी अमोल कदम व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी चरण कोल्हे यांनी दिली.



### सावदा नगरपालिकेत नगरसेवक पदी भा.ज.पा उमेदवार विजयी

**रावेर (स. गांवकरी) :** तालुक्यातील महत्वाच्या समजल्या जाणाऱ्या सावदा नगरपालीकेत भजपाच्या सौ रंजनाताई जितेंद्र भारंबे यांची निवड झाल्याबद्दल त्यांच्यावर शुभेच्छाचा होत आहे . तसेच या प्रभागातून शिवसेना शिंदे गटाच्या युती उमेदवार पठाण तबस्सुम बानो फिरोज खान शिवसेना उमेदवार बिविरोध निवडून आलेल्या आहेत. प्रसंगी निवळणूक प्रमुख नंदुभाऊ महाजन भा.ज.पा ता.अध्यक्ष श्री दुर्गादास पाटील,सरचिटणीस श्री महेश अकोले,श्री विनायक कोळी, भा ज पा नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ रेणुका पाटील सौ नंदाताई लोखंडे श्री जे.के.भारंबे,श्री विक्की भिडे,श्री सागर चौधरी,श्री मनिष भंगाळे इ.तसेच भा.ज.पा शिवसेना युती गटाला यश मिळाल्याने , आनंद व्यक्त केला जात आहे . यावेळी असंख्य पदाधिकारी,कार्यकर्ते मोठ्या संखेने उपस्थित होते . त्यातप्रामुख्याने छोटु पाटील , राजेंद्र चौधरी , फिरोज खान , पंकज येवले , सुरज परदेशी , यांचा समावेश होता .

# नाशिकच्या समस्यांवर आमदार फरांदे थेट मुख्यमंत्र्यांकडे

- शहरातील खड्डेप्रश्नी आमदार फरांदेंची थेट मुख्यमंत्र्यांकडे तक्रार

**नाशिक : (समर्थ गांवकरी)**



नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील रस्त्यांची गंभीर दुरावस्था लक्षात घेता आमदार प्रा. देवयानी फरांदे यांनी बुधवार (दि. 19) रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेत निवेदन दिले. शहरातील खड्डेमय रस्त्यांनी निर्माण केलेल्या भीषण स्थितीबाबत त्यांनी मुख्यमंत्र्यांना सविस्तर माहिती देत त्वरित हस्तक्षेपाची मागणी केली. आमदार फरांदे यांच्या निवेदनाची दखल घेऊन मुख्यमंत्र्यांनी नाशिक महापालिका आयुक्तांना तातडीच्या दुरुस्तीबाबत निर्देश दिले आहेत.

यावेळी आमदार फरांदे यांनी नाशिकच्या समस्यांबाबत मुख्यमंत्र्यांशी चर्चा केली. पावसाळ्यानंतर शहरातील प्रमुख आणि दुय्यम रस्ते मोठ्या प्रमाणावर खड्डेमय झाले आहेत. अनेक भागांमध्ये खड्डे एवढे वाढले की दैनंदिन वाहतुकीस मोठ्या अडचणी निर्माण झाल्या असून अपघातांची संख्याही वाढली आहे. नाशिककर अक्षरशः हैराण झाले असून नागरिकांच्या सुरक्षिततेवर गंभीर परिणाम होत आहे. महापालिकेने शहरात खड्डे बुजविण्याची मोहीम राबविली असली तरी रस्त्यांच्या दुरुस्तीचे काम साचेबद्ध पद्धतीने होत नसल्याचे अनेक ठिकाणी दिसून आले असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

नाशिक महापालिकेच्यावतीने खड्डे बुजविण्याची मोहिम हाती घेण्यात आली असली तरी अनेक ठिकाणी रस्ता तयार करण्यात आल्यानंतर सील कोट न केल्यामुळे काही दिवसांतच ते नादुरुस्त होत असल्याचे निदर्शनास आले. परिणामी रस्ते कामाच्या निधीचाही अपव्यय होत असून शहरातील वाहतुकीवर अतिरिक्त ताण निर्माण होत आहे ही बाब आमदार फरांदे यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या निदर्शनास आणून दिली.

शहरात विविध कामांसाठी रस्ते खोदकाम केले जाते. एम.एन. जी.एल. तसेच इतर यंत्रणांकडून रस्ते खोदकामासाठी शुल्क भरले जात असले तरी खोदकामानंतर योग्य व दर्जेदार दुरुस्ती होत नसल्याचेही नागरिकांनी निदर्शनास आणून दिले आहे. या निष्काळजीपणामुळे सर्वसामान्य नागरिकांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. यामुळे रस्ते अधिक खराब होतात, वाहतूक कोंडी होते. यासंदर्भात उचित कारवाई करून निकृष्ट दर्जाचे काम करणार्या ठेकेदारांवर दंडात्मक कारवाई व आवश्यकतेनुसार ब्लॅकलिस्टिंग करावे, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

रस्ते दुरुस्तीकरिता शासकीय कंपन्यांकडूनच डांबर खरेदी करणे बंधनकारक असतानाही काही यंत्रणांकडून खाजगी यंत्रणेकडून डांबर खरेदी होत असल्याची गंभीर बाबही आमदार फरांदे यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या निदर्शनास आणली. यावर मुख्यमंत्र्यांनी तात्काळ लक्ष देऊन - डांबर फक्त शासकीय कंपन्यांकडूनच खरेदी करावे असा स्पष्ट आदेश महापालिका प्रशासनाला दिला. नाशिक शहरातील सर्व रस्त्यांच्या तात्काळ दुरुस्तीचे आदेश देण्यात यावेत.

> मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन शहरातील खराब रस्त्यांसंदर्भात परिस्थिती त्यांच्यासमोर मांडली आहे. निकृष्ट काम करणाऱ्या ठेकेदारांवर कारवाई, दर्जानियंत्रणासाठी स्वतंत्र पथक, आणि रस्त्यांच्या दुरुस्तीची जलद अंमलबजावणी - या सर्व बाबींवर निवेदन दिले आहे. मुख्यमंत्री यांनी तातडीने दखल घेत महापालिका प्रशासनाला कठोर निर्देश दिले आहेत.
> **- आ. प्रा. देवयानी सुहास फरांदे**

# नाशिक विमानतळ विस्तारीकरणास प्रशासकीय मान्यता

**नाशिक : (समर्थ गांवकरी)**

आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा विकास प्राधिकरणाने नाशिक (ओझर) विमानतळाच्या विस्तारीकरणास प्रशासकीय मान्यता दिली आहे. विमानतळ विस्तारीकरणाचे काम मार्च २०२७ पूर्वी पूर्ण करावे, असे निर्देश प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांनी दिले आहेत. नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा विकास प्राधिकरणाची दूरदृश्य संवाद प्रणालीच्या माध्यमातून बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. यावेळी प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह, पोलिस आयुक्त संदीप कर्णिक, नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे आयुक्त जलज शर्मा, सार्वजनिक बांधकाम विभागाचे प्रादेशिक अभियंता प्रशांत औटी, अधीक्षक अभियंता अरुंधती शर्मा, अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार, पोलिस अधीक्षक बाळासाहेब पाटील (ग्रामीण), एचएएलचे वरीष्ठ अधिकारी आदी सहभागी झाले होते.

# धामणगाव गटातील सर्व शालेय विद्यार्थ्यांना वही पेनचे वाटप

- सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत आढार यांचा स्तुत्य उपक्रम

**इगतपुरी : (समर्थ गांवकरी)**




बालदिनाचे औचित्य साधत आद्यक्रांतिकारक राघोजी भांगरे,धरती आबा भगवान बिरसा मुंडा यांच्या संयुक्त जयंती सप्ताहानिमित्त इगतपुरी तालुक्यातील धामणगाव गटातील सर्व जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या शालेय विद्यार्थ्यांना सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत भाऊ आढार यांनी वही पेनचे वाटप केले आहे. बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त एक आगळावेगळा उपक्रम राबवत सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत भाऊ यांनी निनावी, भरविहिर, भंडारदरा वाडी व घोरपडवाडी येथील मराठी शाळांमध्ये शैक्षणिक साहित्य व चॉकलेटचे वाटप करून विद्यार्थ्यांचा बालदिन खास बनवला. शाळांमधील लहानग्यांच्या चेहऱ्यावर चमकणारे हास्य आणि आनंदाचे स्वर म्हणजेच या उपक्रमाचे खरे यश ठरले आहे. क्रांतीवीरांची प्रेरणा आणि बालदिनाचा आनंद—या दुहेरी उत्साहामुळे संपूर्ण परिसरात आनंदाचे उत्सवमय वातावरण निर्माण झाले. या कार्यक्रमात गावातील नागरिकांसोबतच संपत मोंढे, गणपत बोंद्रे, सोमनाथ क्षिरसागर, शिवाजी पगारे यांसारखे मान्यवरही मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाला भक्कम पाठबळ दिले. त्यांच्या उपस्थितीमुळे या सामाजिक स्तुत्य उपक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा उपक्रमांची गरज असल्याचे उपस्थित मान्यवरांनी सांगितले. "बालदिन आणि आद्य क्रांतीवीरांचा प्रेरणादिवस" असा हा संगम गावकऱ्यांसाठीही प्रेरणादायी ठरला. ग्रामीण आदिवासी बहुल भागातील शाळांमध्ये शालेय साहित्याचे वाटप करणे हा उपक्रम विद्यार्थ्यांचा शालेय आत्मविश्वास वाढविण्यासाठी महत्वाचा ठरत आहे असे मत सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत भाऊ आढार यांनी व्यक्त केले.

# डॉ विलासभाऊ पांगारकर यांच्या हितगुज स्नेहमिलन कार्यक्रम संपन्न

**नाशिक/सिन्नर : (समर्थ गांवकरी)**

छावा भारत क्रांती मिशन चे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ.विलास भाऊ पांगरकर यांच्या वृत्तीने सोमवारी (दि १७) शर्वरी लॉन्स,वावी (सिन्नर) येथे भव्य हितचिंतक–नातेवाईक हितगुज स्नेहमेळावा उत्साहात पार पडला. यावेळी नांदूर शिंगोटे गटातील सर्व गावांतील बारा बलुतेदार,अठरा पगड समाजबांधव,व तरुण मोठ्या संख्येने उपस्थित होते. डॉ.पांगरकर यांच्या दीर्घकालीन समाजकार्यातील योगदानाचा गौरव करताना, संकटकाळात त्यांनी केलेल्या मदतीचा,राबविलेल्या उपक्रमांचा आणि लोकाभिमुख नेतृत्वशैलीचा उल्लेख उपस्थित मान्यवरांनी केला.भारत क्रांती मिशनचे राष्ट्रीय अध्यक्ष व छावा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष या नात्याने त्यांनी गेल्या ३० वर्षा पासून केलेल्या कामाचा उल्लेख विशेषत्वाने झाला. गेल्या १६ वर्षा पासून राष्ट्रीय शिवजयंती उत्सव विविध राज्यात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येत आहे. यावर्षी १९ फेब्रुवारी छत्रपती शिवाजी महाराज शिवजन्मोत्सव निमित्ताने नाशिक ते जयपूर रथ यात्रा काढण्यात आली होती. राजस्थानची राजधानी जयपूर येथे राजभवन येथे राज्यपाल हरिभाऊ बागडे, राजस्थानचे मुख्यमंत्री भजनलाल शर्मा यांच्या हस्ते शिव रथाचे पूजन करण्यात आले होते. जयपूर सिटी तून भव्य मिरवणूक काढण्यात आली . १४ मे २०२५ रोजी नाशिक ते

दिल्ली धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज राष्ट्रीय गौरव रथ यात्रा काढण्यात आलीं . १५ फुटांचे भारतातील पहिला धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचा अश्वरूढ पुतळा बनवण्यात आला होता. गेल्या ३ वर्षापासून राजधानी दिल्लीत जयंती साजरी करण्यात येणार आहे. वेरूळ येथे स्वराज्य संकल्पक शहाजीराजे भोसले यांची देखील जयंती साजरी करण्यात येते. राजमाता जिजाऊ यांची जयंती देखील मोठ्या उत्साहात साजरी करण्यात येते. सर्व सामान्य आज युवा पिढीला ह्या महापुरुषाचे कार्य इतिहास कळवा. यासाठी राष्ट्रीय स्तरावर हे कार्यक्रम करण्यात येत आहे. त्याच प्रमाणे समाजातील विविध प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम डॉ विलासभाऊ पांगारकर करतात.

मराठा आरक्षण लढ्यातील सातत्यपूर्ण,संघर्षपूर्ण आणि प्रभावी भूमिकेचा उल्लेख झाला. मराठा आरक्षणाचे पुरस्कर्ते मनोज जरांगे पाटील यांच्याशी असलेले त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध आणि समाजासाठी त्यांनी राबवलेले आंदोलनही अधोरेखित करण्यात आले.या सर्व कामाची पावती म्हणून त्यांना अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले त्यामध्ये राज्य देश विदेश पातळीवरचे पुरस्कार सुद्धा आहेत.

नांदूर–शिंगोटे गटाचा सर्वांगीण विकास — भविष्याचा रोडमॅप

मेळाव्यात डॉ.विलास पांगरकर यांच्या नेतृत्वाखाली गटासाठी पुढील महत्त्वाचे विकास आराखडे जाहीर करण्यात आले.हे मुद्दे गटातील लोकांच्या गरजांना थेट स्पर्श करणारे आणि भविष्यकाळात परिवर्तन घेऊन येणारे आहेत:

नांदूर–शिंगोटे गटातील प्रत्येक गावात विकासाची नवी पहाट उगवेल.त्यांच्या नेतृत्वातील प्रामाणिकता,संघर्षशीलता आणि जिव्हाळ्याचे संबंध या गटाच्या परिवर्तनात निर्णायक भूमिका बजावतील अशी भूमिका उपस्थित नागरिकांनी मांडली.

# आ. दातेंच्या वर्षपूर्ती सोहळ्यास नवनागापूरमध्ये उत्स्फूर्त प्रतिसाद

## एक वर्षातील विकासकामांचा आढावा आणि 'खेळ पैठणीचा

**नवनागापूर,ता.नगर : (समर्थ गांवकरी)**

पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे लोकमान्य आणि जनसंपर्कशील नेतृत्व म्हणून ओळखले जाणारे आमदार काशिनाथ दाते सर यांच्या आमदारकीच्या यशस्वी वर्षपूर्तीचा भव्य आणि उत्साहवर्धक कार्यक्रम नवनागापूर येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला. आमदार दाते सरांच्या जनसंपर्क, विकासदृष्टी आणि समाजाभिमुख कार्याची जनतेने घेतलेली दखल या सोहळ्यात पाहायला मिळाली. कार्यक्रमाचा उत्साहवर्धक माहोल हा आमदार दाते सरांवरील जनतेच्या प्रेमाचा आणि विश्वासाचा जिवंत पुरावा होता.

या कार्यक्रमाला अनेक मान्यवरांनी उपस्थिती लावून कार्यक्रमाची शोभा वाढवली. त्यात सौ. शितलताई संग्रामभैय्या जगताप, सौ. सुमन काशिनाथ दाते, उद्योजक दिलीप दाते, सौ. अर्चना दिलीप दाते, अप्पासाहेब (बंडूनाना) सप्रे, वडगाव गुप्ताचे माजी सरपंच विजयराव शेवाळे, सुभाष दांगट, सागर सप्रे, दीपक गीते, डॉ. संजीव गडगे, ताराचंद डोंगरे, भाजप कार्याध्यक्ष रामभाऊ घाडगे, आप्पा पवार, हर्षद पटेल, राहुल सप्रे, महेश कांडेकर, धनराज सप्रे, सनी सप्रे, नरेश शेळके, रेणुका पुंड, नितीन खंदारे, हेमंत लगड, प्रतीक दादा शेळके, सौ. सोनूताई शेवाळे, सुशीला जगताप, सौ. संगीता भापकर, सौ. स्वाती सप्रे, सौ. मंगल गोरे, सौ. वंदना दांगट, सौ. पूजा सप्रे, सौ. रेणुका पुंड, सौ. सुमन सप्रे, सौ. शुभांगी भोराडे, आकाश कोल्हाळ, आकाश पवार, दीपक बरे, विशाल घोलप, शंकर पवार, अक्षय पिसे, रामभाऊ अडसूरे, श्रीकांत पवार, रोहित माने, विकास शिंदे, ऋषिकेश तागडकर, ऋषिकेश वाघ, सचिन शिंदे, विपुल भोसले, निखील शिंदे,




अनमोल पुराणे, अविनाश पंडित, प्रतिक कवडे, अभिजित सप्रे यांसह परिसरातील महिला भगिनींचा मोठ्या प्रमाणावर सहभाग होता.

या प्रसंगी मतदारसंघातील पारनेर आणि नगर तालुक्यातील ४० गावांमध्ये एकाच वर्षात करण्यात आलेल्या विविध विकासकामांचा सविस्तर आढावा मांडण्यात आला. सन २०२४-२५ आणि २०२५-२६ या आर्थिक वर्षांत आमदार दाते सरांच्या पाठपुराव्यामुळे पारनेर तालुक्यासाठी ६०२४.३५ लाख आणि नगर तालुक्यातील मतदारसंघात समावेश असलेल्या चाळीस गावांसाठी ९२८.२५ लाख, अशी एकूण ६९५२.६० लाख रुपयांची कामे मंजूर झाल्याची माहितीही उपस्थित जनतेसमोर यावेळी मांडण्यात आली. रस्ते, पाणी, वीज, शिक्षण, आरोग्य, तांडा वस्ती सुधारणा, जनसुविधा, पर्यटन विकास, पंचायत सेवा-विस्तार अशा विविध क्षेत्रांमध्ये गतीमान झालेल्या शेकडो कामांमुळे मतदारसंघाच्या विकासाचा आलेख उंचावल्याचे चित्र यावेळी स्पष्ट झाले.

कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरला तो महिलांसाठी आयोजित करण्यात आलेला "खेळ पैठणीचा" हा उपक्रम. हजारो लाडक्या बहिणींच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडला.

महिलांच्या सन्मानासाठी आयोजित केलेला हा उपक्रम आमदार दाते सरांच्या संवेदनशीलतेचा आणि सांस्कृतिक मूल्यांबद्दलच्या आदरभावाचा उत्कृष्ट प्रत्यय देणारा ठरला. बहिणींनी उत्स्फूर्त सहभागातून व्यक्त केलेले प्रेम आणि आनंद या संपूर्ण सोहळ्याचे वैशिष्ट्य ठरले. या वर्षपूर्ती सोहळ्यादरम्यान मतदारसंघातील जनतेच्या मनात घर करणाऱ्या आमदार दाते सरांच्या कार्यपद्धतीबाबतही अनेक आठवणी उजाळल्या. गावोगावी फिरून जनतेच्या प्रश्नांना प्राधान्य देत आणि विकासकामांना गती देत त्यांनी पहिल्या वर्षातच समाजात दृढ विश्वास निर्माण केला.

विकासाची बांधिलकी आणि लोकांसोबतचा जिव्हाळा यामुळे त्यांचे नेतृत्व अधिकच बळकट झाल्याचे वातावरण सभोवताली जाणवत होते. या भव्य कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन मा. आमदार काशिनाथ दाते सर मित्र मंडळ, नवनागापूर – वडगाव गुप्ता आणि स्थानिक ग्रामस्थांनी उत्कटतेने केले.

> "हा वर्षपूर्ती सोहळा हा माझा नाही, तर पारनेर-नगर मतदारसंघातील जनता आणि कार्यकर्त्यांच्या प्रेमाचा उत्सव आहे. एका वर्षात केलेली कामे ही सर्वांची सामूहिक ताकद आणि जनतेच्या सहकार्यामुळेच शक्य झाली.'खेळ पैठणीचा' उपक्रमात बहिणींनी दाखवलेला उत्स्फूर्त सहभाग माझ्यासाठी मोठी प्रेरणा आहे. आगामी काळातही विकासकामांचा वेग आणखी वाढवून जनतेच्या विश्वासाला पात्र राहण्याचे माझे प्रयत्न सुरूच राहतील."
> **- आमदार काशिनाथ दाते सर, (विधानसभा सदस्य)**

# फ्लिपकार्टने शून्य कमिशन मॉडेल केले लाँच

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

भारतातील घरगुती ई-कॉमर्स मार्केटप्लेस, फ्लिपकार्टने १००० रुपयांपेक्षा कमी किमतीच्या उत्पादनांसाठी शून्य कमिशन मॉडेल लाँच केले आहे आणि त्यांचे सेलर रेट कार्ड लक्षणीयरीत्या सुधारित केले आहे. ऑनलाइन विक्री अधिक समावेशक आणि वाढीवर आधारित करण्याच्या त्याच्या वचनबद्धतेनुसार, हे मॉडेल खर्च व्यवस्थापन सुलभ करते, स्पर्धात्मक किंमतींना प्रोत्साहन देते आणि देशभरातील लघु आणि मध्यम उद्योगांसाठी फ्लिपकार्टच्या




मूल्य प्रस्तावाला बळकटी देते.

रेट कार्डमधील या धोरणात्मक बदलाचा फ्लिपकार्टच्या हायपरव्हॅल्यू प्लॅटफॉर्म, शॉप्सीवर महत्त्वपूर्ण परिणाम होतो. किंमत काहीही असो, शॉप्सीवरील सर्व उत्पादनांवर शून्य कमिशन मॉडेल लागू करण्यात आले आहे. यामुळे हायपरव्हॅल्यू सेगमेंटला लक्ष्य करणाऱ्या विक्रेत्यांना बळकटी मिळेल आणि ग्राहकांसाठी उत्पादने अधिक परवडणारी होतील. झिरो कमिशन मॉडेल अधिक स्थानिक आणि उदयोन्मुख एमएसएमई ब्रँडना डिजिटल अर्थव्यवस्थेत सामील होण्यास आणि देशभरातील लाखो ग्राहकांना चांगले मूल्य आणि पर्याय ऑफर करण्यास सक्षम करण्यासाठी डिझाइन केले आहे. या सुधारित रचनेअंतर्गत, ₹१,००० पेक्षा कमी किमतीची उत्पादने विकणाऱ्या सर्व पात्र विक्रेत्यांना कमिशन शुल्कातून सूट दिली जाईल. या उपक्रमाचे उद्दिष्ट एमएसएमईना पाठिंबा देणे आहे, ज्यामुळे त्यांना ग्राहकांना अधिक परवडणारी उत्पादने देता येतील आणि त्याचबरोबर व्यवसायाचा खर्च प्रभावीपणे कमी करता येईल.

झिरो कमिशन मॉडेल फ्लिपकार्टच्या पारदर्शक प्रक्रिया, तंत्रज्ञान-चालित साधने आणि इकोसिस्टम सपोर्टद्वारे विक्रेत्यांना यशस्वी होण्यास सक्षम करण्याच्या प्रयत्नांशी सुसंगत आहे. खर्च सुलभ करून, फ्लिपकार्ट त्याच्या विक्रेत्यांना प्लॅटफॉर्मवर विस्तार, व्यवस्थापन आणि वाढ करणे पूर्वीपेक्षा सोपे करत आहे. हे झिरो कमिशन मॉडेल फ्लिपकार्टच्या मूल्य प्रस्तावात वाढ करेल, तसेच इकोसिस्टम-मजबूत करणारे फायदे देखील प्रदान करेल.

फ्लिपकार्टची मजबूत पुरवठा साखळी विक्रेत्यांना अतुलनीय अंदाज आणि विश्वासार्हता प्रदान करते. तंत्रज्ञान आमच्या प्रणालीच्या केंद्रस्थानी आहे. मागणीचा अंदाज लावण्यासाठी मशीन लर्निंगचा वापर केला जातो.



मंचर नगरपंचायतीच्या नगराध्यक्ष व 17 प्रभागासाठी निवडणूक होत असून उमेदवारी अर्जांची छाननी झाली. नगरपंचायत कार्यालयात निवडणूक निर्णय अधिकारी अंजली कुलकर्णी, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी गोविंद जाधव यांच्या उपस्थितीत ही छाननी झाली. छाननीच्या वेळी सर्वपक्षीय कार्यकर्त्यांनी गर्दी केली होती. पोलिसांनी योग्य नियोजन करून प्रभागनुसार कार्यकर्त्यांना छाननीसाठी आतमध्ये सोडले. सुरुवातीला नगराध्यक्ष व त्यानंतर प्रत्येक प्रभागानुसार छाननी करण्यात आली.नगराध्यक्ष पदासाठी 9 अर्ज आले होते 2 अर्ज अवैध ठरले असून 6 अर्ज वैद्य ठरले. 17 प्रभागासाठी तब्बल 114 अर्ज भरण्यात आले होते छाननी मध्ये 22 अर्ज बाद करण्यात आले आहे 92 अर्ज वैद्य ठरले आहे. नगराध्यक्ष व नगरसेवक पदाच्या 17 जागांसाठी 83 उमेदवार रिंगणात आहे.

## थोडक्यात बातम्या...



### यशस्वी किडनी प्रत्यारोपणानंतर ९ वर्षीय मुलीला जीवनदान

पुणे (स. गांवकरी) : पुण्यातील खराडी येथील मणिपाल हॉस्पिटलमधील डॉक्टरांनी अंतिम टप्प्यातील किडनी आजाराने पीडित असलेल्या 9 वर्षीय मुलीवर जिवंत दात्याचे किडनी प्रत्यारोपण यशस्वीरित्या केले आहे. या दुर्मिळ व यशस्वी केसमध्ये या मुलीला तिच्या 69 वर्षीय आजीकडून किडनी मिळाली, ज्यामधून दिसून येते की, मुलांमध्ये प्रत्यारोपण करताना वय आणि कौटुंबिक नात्याचा विचार केला जाऊ शकतो. 9 वर्षीय सक्रिय व हुशार मुलीला सौम्य स्वरूपाचा ताप, अशक्तपणा व खोकला या तक्रारींसह हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. बालरोगतज्ज्ञांकडून पुढील उपचार व चाचणीमधून फक्त 3 g/dl ची अत्यंत कमी हिमोग्लोबिन पातळी असल्याचे निदर्शनास आले. पुढील तपासण्यांमधून किडनी कार्यावर गंभीर परिणामाची पुष्टी झाली आणि इमेजिंगमधून दिसून आले की दोन्ही किडन्या अत्यंत लहान होत्या आणि आकुंचन पावल्या होत्या. यामधून गंभीर किडनीच्या आजाराचे निदान झाले, ज्याकडे मूत्रमार्गात लक्षणे दिसून न आल्याने दुर्लक्ष झाले होते. हे निदान कुटुंबासाठी धक्कादायक ठरले, त्यांची लहान मुलगी किडनी फेल्युअरचा सामना करत असल्याचे सत्य स्वीकारणे त्यांना अवघड झाले. किडनी प्रत्यारोपणाच्या गरजेने त्यांच्या दु:खामध्ये अधिक भर केली. या आव्हानात्मक काळामध्ये या लहान मुलीने उल्लेखनीय धाडस दाखवले, तिच्या 69 वर्षीय आजीने स्वत:ची किडनी दान करण्याचा निर्णय घेत अधिक मोठे धैर्य दाखवले. या केसमधून कुटुंबामध्ये प्रेम व आशेची क्षमता दिसून आली.

### वंचित विकासतर्फे संगीत मैफल

पुणे (स. गांवकरी) : वंचित विकास संस्थेतर्फे 'मनात रुजलेली गाणी', या संगीत मैफलीचे येत्या शनिवारी (ता. २२) सायंकाळी ५ वाजता लेडी रमाबाई हॉल, स. प. महाविद्यालय, टिळक रस्ता पुणे येथे आयोजन करण्यात आले आहे. संस्थेचे सभासद, हितचिंतक आणि रसिक श्रोत्यानी एकत्र येऊन संस्थेविषयी अधिक जाणून घ्यावे, एकमेकांशी जोडले जावे, यासाठी ही मैफल आयोजित केली आहे. यामध्ये गानसम्राज्ञी लता मंगेशकर, वसंतराव देशपांडे, अरुण दाते, आशा भोसले, सुमन कल्याणपूर आदी गायकांनी, तर पंडित हृदयनाथ मंगेशकर, सुधीर फडके, वसंत प्रभू अशा प्रसिद्ध संगीतकारांनी अजरामर केलेली, मनात खोलवर रुजलेली गाणी या मैफलीत श्रोत्यांना ऐकायला मिळणार आहेत. मराठी गीतांच्या विश्वासातील हा रम्य प्रवास सुधांशु नाईक, आरती परांजपे, चैत्राली अभ्यंकर उलगडणार आहेत, असे कार्यवाह संचालिका मीनाताई कुर्लेकर यांनी सांगितले. समाजातील विविध स्तरातील घटकांना स्वाभिमानी व उत्तम आयुष्य जगता यावे, यासाठी धडपडणाऱ्या विलास चाफेकर यांनी वंचित विकास संस्थेची स्थापना केली. त्यातून अनेक लोकोपयोगी प्रकल्प उभे राहिले. आदिवासी, परित्यक्त्या, ज्येष्ठ नागरिक, देहविक्रय जाणाऱ्या महिला, त्यांची मुले, आरोग्य विषयक समस्या अशा अनेक आघाड्यावर ही संस्था काम करते. लहान मुलांसाठी 'निर्मळ रानवारा' मासिक, मुलांसाठी 'निहार'सारखे निवासी संकुल आदी प्रकल्प उल्लेखनीय आहेत, असे कुर्लेकर यांनी नमूद केले.



### देवळा तालुक्यात कापराई शिवारात बिबट्याची दहशत

देवळा तालुका (स. गांवकरी) : देवळा तालुक्यात बिबट्याचे पुनश्च हल्ले सुरूच असून कापराई शिवारासह परिसरात दहशतीचे सावट पसरले आहे. काही दिवसांपूर्वी महालपाटणे येथील शेतकऱ्याच्या बैलजोडीवर बिबट्याने हल्ला करून त्यांना फस्त केले होते. त्यानंतर आज (दि. १९) पहाटे वाखारी गावाजवळील कापराई शिवारात शेतकरी रविंद्र मंगा भदाणे यांच्या गोऱ्ह्यावर बिबट्याने हल्ला करून त्याचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली. या घटनेनंतर परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. कापराई शिवार डोंगरदऱ्यांमध्ये वसले असून बारी परिसरात घनदाट जंगल असल्याने वन्यप्राणी वस्ती भागात शिरण्याच्या घटना वाढल्या आहेत. विशेष म्हणजे, या भागातील लहान मुले रोज सकाळी शाळेत जाण्यासाठी डोंगराळ रस्त्याने जात असतात. त्यामुळे पालक आणि ग्रामस्थांमध्ये मोठी चिंता निर्माण झाली आहे. घटनेची माहिती मिळताच वनविभागाचे अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी दाखल होऊन पंचनामा करण्यात आला. दरम्यान, माजी जिल्हा परिषद सदस्या डॉ. नूतन आहेर यांनी या घटनांचा तीव्र निषेध नोंदवत वनविभागाकडे तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. डॉ. आहेर म्हणाल्या, देवळा तालुक्यात बिबट्याचा त्रास सतत वाढत आहे. शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत असून नागरिकांच्या जीविताला देखील धोका वाढला आहे. वनविभागाने त्वरित पिंजरे लावून या हिंस्र प्राण्याचा बंदोबस्त करावा अशी मागणी केली. स्थानिक नागरिकांनीही वनविभागाकडे मागणी केली आहे की बिबट्या आढळलेल्या ठिकाणी तातडीने पिंजरे बसवावेत, गस्त वाढवावी अशी मागणी केली.

# विद्यार्थ्यांना मार्गदर्शन, प्रोत्साहनासाठी तज्ज्ञांचे 'सूर्यदत्त' मध्ये येणे गौरवास्पद

**प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांचे प्रतिपादन; सूर्यदत्त विधी महाविद्यालयात प्रथम वर्षाचा स्वागत समारंभ**

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

"एखाद्या गोष्टीकडे बघण्याचा तुमचा दृष्टीकोन कसा आहे, त्याप्रमाणे तुमचे जीवन घडत जाते. त्यामुळे नेहमी सकारात्मक दृष्टीकोन ठेवत, उत्कृष्टतेचा ध्यास बाळगायला हवा. वकिली करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी कायदेविषयक पुस्तक वाचनाचे वेड लावून घ्यावे," असे प्रतिपादन मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती राजेश पाटील यांनी केले. पाटील यांचे मार्गदर्शन २०० विद्यार्थ्यांसाठी उत्साही, प्रेरणादायी आणि विचारप्रवर्तक ठरले.



सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशन संचालित सूर्यदत्त विधी महाविद्यालयाच्या (लॉ कॉलेज) प्रथम वर्षाचा स्वागत समारंभ 'सूर्यदत्त'चे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया आणि उपाध्यक्ष व सचिव सुषमा चोरडिया यांच्या मार्गदर्शनाखाली नुकताच झाला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून राजेश पाटील बोलत होते. 'सूर्यदत्त'च्या बावधन कॅम्पसमध्ये आयोजित कार्यक्रमावेळी पाटील यांच्या पत्नी, जेजुरीतील मार्तंड देवस्थानचे विश्वस्त व सूर्यदत्त विधी महाविद्यालयाचे सल्लागार मंडळ सदस्य ॲड. पांडुरंग थोरवे, प्राचार्या केतकी बापट, डॉ. मोनिका सेहरावत यांच्यासह शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राजेश पाटील यांनी आपल्या आयुष्यातील हृदयस्पर्शी प्रसंग सांगत विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले. ते म्हणाले, "प्रत्येक गोष्टीला एक चांगला,

तर दुसरा वाईट पैलू असे दोन पैलू असतात. तुम्ही कोणत्या पैलूचा स्वीकार करता, त्यावर तुमच्या जीवनाचा प्रवास ठरतो. सुरुवातीच्या काळात वकिली व्यवसायाकडे गांभीर्याने पाहिले आणि माझ्या आयुष्याला कलाटणी मिळाली. या पिढीतील विद्यार्थी भाग्यवान असून, त्यांना फारसा संघर्ष करावा लागत नाही. आपले पालक आपल्या सर्व गरजा पुरवत आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी उत्कृष्टतेचा ध्यास घेऊन यशस्वी व्हावे."

"आपल्या ज्ञानात भर पाडण्यासाठी वाचन खूप गरजेचे असते. वकिलीशी संबंधीत पुस्तकांचे वाचन तर जरूर कराच; पण अवांतर वाचनही करा. त्यातून तुमचा दृष्टीकोन, समज आणि वैचारिक भूमिका अधिक व्यापक होत जाते. वकिली करताना अनेक केसेसमध्ये संदर्भ देण्याची दृष्टी मिळते. डॉ. अब्दुल कलाम यांच्या अग्निपंख पुस्तकाचे वाचन करताना मला अनेक गोष्टी भावल्या. त्यातील काही उदाहरणे माझ्या वकील मित्रांना बाजू मांडताना उपयोगी पडतात. या पुस्तकातील चांगल्या विचारांचा संदर्भ न्यायिक बाजू मांडताना देता येतो," असे त्यांनी नमूद केले.

प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया म्हणाले, "सन्माननीय न्यायमूर्ती राजेश पाटील कोणतीही कायदाविषयक पार्श्वभूमी नसताना या पदावर पोहोचले आहेत. त्यांचे कौटुंबिक पार्श्वभूमी शिक्षकाची आहे. त्यांच्या कुटुंबातील ते पहिलेच वकील असून, सध्या न्यायमूर्ती म्हणून सेवा देत आहेत.

# ॲमवे इंडिया : 'न्यूट्रिलाइट व्हिटॅमिन डी प्लस बोरॉन' लाँच

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

मनुष्य आज जगत असलेल्या जीवनशैलींमुळे पोषणात तुटी निर्माण होत असल्याने ग्राहक आता संपूर्ण कल्याणाकडे लक्ष देत आहेत, जेणेकरून आरोग्यदायी आयुष्यांना आधार पुरविता येईल. व्हिटॅमिन डी कमी पडणे यांतील एक चिंता आहे, कारण ही विभिन्न वयोगटातील लोकांवर परिणाम करणारी एक गुप्त महामारी आहे आणि यामुळे पोषण संबंधीच्या कमतरता सक्रियपणे हाताळण्याची गरज स्पष्ट दिसून येते. ॲमवे इंडिया या आरोग्यास आणि कल्याणास आधार पुरविणारी आघाडीची कंपनी आहे आणि तिने ग्राहकांच्या गरजा लक्षात घेऊन व आपल्या पोषण संबंधित प्राविण्यात प्रगती करत, न्यूट्रीलाइट व्हिटॅमिन डी प्लस बोरॉन, हे वैज्ञानिकदृष्ट्या डिझाइन केलेले फॉर्म्युलेशन लाँच केले आहे. यात व्हिटॅमिन डी ची इष्टतम पातळी राखण्यास मदत करणारे आणि हाडे व रोगप्रतिकारक आरोग्यास आधार पुरविणारे घटक आहेत. श्री. रजनीश चोप्रा, व्यवस्थापकीय संचालक, ॲमवे इंडिया या लाँच वर बोलताना म्हणाले, 'आजचे जग अतिशय वेगवान बनलेले आहे आणि अशा या जगात, बदलती जीवनशैली आणि सूर्यप्रकाशाशी संपर्क मर्यादित प्रमाणात झाल्याने संपूर्ण भारतात व्हिटॅमिन डी ची कमतरता अतिशय प्रमाणात वाढलेली आहे.

# अनुव जैनचा पहिलाच वर्ल्ड टूर! 'दस्तखत' द्वारे भारतातील १० शहरांमध्ये भेट

**नवी दिल्ली : (समर्थ गांवकरी)**

चार्टवर अव्वल ठरलेले गायक-गीतकार अनुव जैन आपल्या सर्वात मोठ्या आणि महत्त्वाकांक्षी संगीत प्रवासाला - त्यांच्या पहिल्या जागतिक दौऱ्याला, 'दस्तखत' - सुरूवात करणार आहेत. हा दौरा केवळ त्यांच्या कलात्मक प्रवासातील एक मोठा टप्पा नाही, तर भारतीय स्वतंत्र संगीतासाठीही एक महत्त्वपूर्ण क्षण आहे. हा दौरा भारतात स्वतंत्र संगीताच्या झपाट्याने वाढलेल्या लोकप्रियतेला एक प्रकारची आदरांजलीही ठरतो.




'दस्तखत वर्ल्ड टूर'चा भारतातील टप्पा, टीम इनोव्हेशन आणि ट्राईबव्हाईब एंटरटेनमेंट यांच्या निर्मिती आणि प्रमोशनसह, जानेवारी 2026 मध्ये सुरू होणार आहे. हा प्रवास नवी दिल्ली, अहमदाबाद, पुणे, चंदीगड, हैदराबाद, इंदूर, मुंबई, जयपूर आणि बंगळूरू या शहरांतून होत जाईल आणि फेब्रुवारी 2026 मध्ये संपन्न होईल.

भारतातील 10 शहरांव्यतिरिक्त, हा दौरा 2026 आणि 2027 दरम्यान जगातील आणखी 23 शहरांपर्यंत विस्तारित होणार आहे. यात ऑस्ट्रेलिया, उत्तर अमेरिका, यूके आणि युरोप तसेच मध्य पूर्वेतील अनेक ठिकाणांचा समावेश असेल. हा दौरा या तरुण संगीतकाराचा पहिलाच भव्य आंतरराष्ट्रीय विश्वदौरा ठरेल आणि एखाद्या भारतीय स्वतंत्र कलाकाराने केलेल्या सर्वात व्यापक थेट कार्यक्रमांपैकी एक मानला जाईल.


त्यांच्या मागील भारत दौऱ्यांच्या - 'दस्तकें' (2021) आणि 'गुलदस्ता' (2023) - अभूतपूर्व यशानंतर, 'दस्तखत' (2026-2027) ही प्रभावी त्रयी पूर्ण करते. ही त्रयी अनुव जैन यांच्या सर्जनशील प्रवासाची कहाणी सांगते - ज्यांना त्यांच्या सहज कथनशैली, मनापासून लिहिलेल्या गीतांमुळे आणि भावपूर्ण संगीतविश्वामुळे प्रेक्षकांचे अपार प्रेम मिळते. चार वर्षांपूर्वी त्यांच्या पदार्पणाच्या दौऱ्याने भारतात इंडी संगीताच्या नव्या लाटेला सुरुवात झाली आणि तो देशभरातील प्रेक्षकांसाठी त्यांची मनापासून केलेली ओळख ठरला. त्यानंतर दोन वर्षांनी झालेला पुढील दौरा हा त्यांच्या वाढीचा आणि प्रेक्षकांशी निर्माण झालेल्या नात्याचा उत्सव बनला - ज्याने एका स्वदेशी कलाकाराने मुख्य मंचावर किती उंच भरारी घेऊ शकते, याची नवी व्याख्या घडवली.

# झी टीव्हीच्या कलाकारांनी पुरुषांच्या सामर्थ्य, संवेदनशीलता आणि चैतन्याचा सन्मान केला!

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

दरवर्षी 19 नोव्हेंबर रोजी साजरा होणारा आंतरराष्ट्रीय पुरुष दिन क्षणभर थांबून आपल्याला आपल्या आयुष्यातील पुरुष, आपले वडील, भाऊ, जोडीदार, मित्र आणि सहकारी यांची दखल घेऊन त्यांचे कौतुक करण्याची आठवण करून देतो. या दिवशी आपण त्यांच्या शांतपणे आणि निःस्वार्थीपणे उचललेल्या जबाबदाऱ्यांचा, त्यांच्या ताकदीचा, सहनशक्तीचा आणि दयाळूपणाचा सन्मान करतो. त्याचवेळी त्यांच्या शांत चेहऱ्यामागे ते मनात लढत असणाऱ्या भावनिक संघर्षांचीही दखल घेतो. फक्त कौतुकापुरते मर्यादित न राहता, हा दिवस पुरुषांचेही म्हणणे ऐकले जाण्यासाठी, त्यांना समर्थन मिळवून देण्यासाठी आणि ते केवळ काय करतात म्हणून नाही तर ते कोण आहेत म्हणून मूल्यवान समजले जाण्यासाठी त्यांच्यासाठी जागा तयार करण्याचीही हाक आहे. हा दिवस आपल्याला खरी ताकद म्हणजे काय हे नव्याने समजून घेण्याची प्रेरणा देतो—कमकुवतपणा टाळणे नव्हे, तर तो धैर्याने स्वीकारणे हीच खरी शक्ती. भावना व्यक्त करणे,





मदत मागणे किंवा थोडा विराम घेणे यामुळे कोणताही पुरुष कमी ताकदवान ठरत नाही हीच या दिवसाची महत्त्वाची आठवण आहे.

या आंतरराष्ट्रीय पुरुष दिनानिमित्त झी टीव्हीवरील लोकप्रिय कलाकार 'जागृति: एक नयी सुबह' मधील आर्य बब्बर, 'जगद्धात्री'ची सोनाक्षी बत्रा, आगामी 'लक्ष्मी निवास' मधील राजेंद्र चावला, 'सरू' मधील मोहक मटकर, 'गंगा माई की बेटियां' मधील शेझान खान आणि 'वसुधा' मधील अभिषेक शर्मा व निशी सक्सेना हे पुरुषांच्या योगदानाचे महत्व, त्यांची ताकद आणि ते आपल्या आयुष्यात दररोज निर्माण करणाऱ्या सकारात्मक प्रभावाबद्दल आपली भावना व्यक्त करत आहेत. झी टीव्हीच्या 'जागृति–एक नयी सुबह' मध्ये कलिकांतची भूमिका साकारणारा आर्य बब्बर म्हणाला, "आंतरराष्ट्रीय पुरुष दिन आपल्याला ही आठवण करून देतो की पुरुष असणे म्हणजे ताकदीच्या मुखवट्यामागे भावना लपवणे नव्हे. खरे धैर्य म्हणजे स्वतःची नाजूक बाजू स्वीकारणे, भावनांना मनापासून जाणून घेणे आणि कुणी पाहत नसतानाही आपल्या मूल्यांशी प्रामाणिक राहणे.

माझ्या मते खरी पुरुषत्वाची ओळख म्हणजे करुणा, इतरांचा आदर करणे, त्यांना आधार देणे, त्यांना उंचावणे आणि त्यात खुद्द स्वतःला न गमावणे. चला, हृदय आणि ताकद या दोन्हींच्या बळावर जगणाऱ्या पुरुषांचा सन्मान करूया."

# ब्लेंडर्स प्राईड फॅशन टूर फॅशनला घेऊन गेला फ्युचरव्हर्समध्ये

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

ब्लेंडर्स प्राइड फॅशन टूरने त्यांच्या गुरुग्राम आवृत्तीत 'द फ्युचरव्हर्स ऑफ फॅशन' ची सुरुवात केली, ज्यामध्ये तंत्रज्ञान, डिझाइन आणि आकर्षक कथाकथन फॅशनच्या अनुभवाची पुनर्कल्पना कशी करत आहे याचा एक अभूतपूर्व शोध घेण्यात आला. फॅशनच्या पुढील वाटचालीची व्याख्या करण्याच्या या वर्षीच्या ध्येयापासून पुढे जात, या आवृत्तीने एक अविश्वसनीयपणे आकर्षक असे दृश्य सादर केले ज्यामुळे फॅब्रिक आणि त्याचे स्वरूप याच्या पलीकडे, AI, कोड आणि परस्परसंवादाच्या डिजिटल युगाची झलक दिसली.




फॅशन डिझाईन कौन्सिल ऑफ इंडिया (FDCI) सोबत फॅशन टूरच्या दीर्घकालीन सहकार्यासोबतच डिझायनर फाल्गुनी आणि शेन पीकॉक यांच्या क्रिएटीव्ह शक्तींनी या प्रदर्शनाचे नेतृत्व केले. आजकालच्या फॅशन क्षेत्रातील प्रेक्षकांना केवळ फॅशनमधील डिझाइन्स बघायचे नाही, तर त्यांना त्याचा अनुभव सुद्धा घ्यायचा आहे ते जिवंत ठेवायचे आहे आणि हीच वास्तविकता या आवृत्तीच्या केंद्रस्थानी आहे.'फॉच्युअरव्हर्स ऑफ फॅशन' ने या इच्छेला म्हणजेच वास्तविकतेला एका आकर्षक विश्वात नेले, जिथे महत्त्वाचा मार्ग म्हणजे फॅशनचा जिवंत कॅनव्हास बनली. आऊटफिट केवळ भविष्यवादी सिल्हूटमध्ये नव्हते तर भविष्यातील विचारांमध्ये देखील होते, ज्यामुळे फॅशनची प्रगती होत आहे याची जागतिक संवेदनशीलता लक्षात येते. ह्युमनॉइड रोबोट्ससह शो ला उत्साही करणारी तमन्ना भाटिया, संपूर्ण शो कथेला जोडणारे डायनॅमिक प्रोजेक्शन, क्षेत्रातील प्रत्येक मॉडेलच्या हालचाली दर्शविणारे मोशन-सेन्सिंग व्हिज्युअल, व्हर्च्युअल आणि वास्तवामध्ये कार्याचा ठसा उमटवणाऱ्या शाहिद कपूरच्या होलोग्राफिक शोस्टॉपिंग क्षणापर्यंत शोकेसच्या प्रत्येक घटकाने प्रेक्षकांना फॅशनच्या पुढील आयामात नेले. ब्लेंडर्स प्राइड फॅशन टूरच्या 'द फ्युचरव्हर्स ऑफ फॅशन' ने फॅशन अनुभवांमधील एक महत्त्वपूर्ण सांस्कृतिक बदल टिपला, जो कलाकुसर आणि भविष्यातील कल्पनाशक्तीचा एक अखंड संगम आहे, जो तंत्रज्ञानाच्या आकर्षक देखाव्यामुळे शक्य झाला आहे. "ब्लेंडर्स प्राइड फॅशन टूर नेहमीच क्रिएटिव्हीटी आणि एक्सप्रेशन यांच्या सीमांच्या पलीकडे नेणारे व्यासपीठ राहिले आहे," असे पर्नोड रिकार्ड इंडियाच्या CMO देबश्री दासगुप्ता म्हणाल्या. "या प्रदर्शनासह, आम्ही 'द फ्युचरव्हर्स ऑफ फॅशन' एक धाडसी पाऊल टाकले आहे - एक आकर्षक करणारा अनुभव जो भविष्यात फॅशन कसे सादर केले जाणार याची व्याख्या मांडतो. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे कॉउचरशी अखंडपणे मिश्रण करून, आम्ही फॅशनला रॅम्पच्या पलीकडे - एका गतिमान, परस्परसंवादी जागेत आणत आहोत जिथे प्रेक्षक गतिमान डिझाइनचा अनुभव घेऊ शकतात. हे भविष्य घडवण्याची आमची वचनबद्धता असे लक्षात आणून देते की, जिथे तंत्रज्ञान आणि शैली सहजतेने एकत्र येतील, नवीन पिढीला फॅशनला ओळख आणि नावीन्यपूर्णतेची सतत विकसित होत असलेली एक्सप्रेशन म्हणून पाहण्यास प्रेरित करते."